# माणूस

शनिवार । २ फेब्रुवारी १९७९ । ७५ पैसे

नुकतेच मुंबईचे काही पत्रकार विदर्भात कापूस एकाधिकार खरेदी योजनेची पाहणी करण्यासाठी गेले होते. या दौऱ्यात सुहास फडके यांना आढळले.....

## ‘ प्रचंड यश ’

पृष्ठ....४

नव्या वाटा शोधणं, नव्या दंतकथा निर्माण करणं किंवा जुन्या पुनर्निर्मित करणं आणि आपला संदेश पोचवण्यासाठी त्या वापरणं हे स्वागतार्हच. पण त्यांचं चौफेर अपयश हे रुळल्या वाटेवरच्या अपयशापेक्षाही अधिक दारुण असतं. असे प्रयत्न व्हायला जशी हरकत नसावी तशीच ती फसल्याचं मत व्यक्त करायलाही नसावी.

## ‘ सीता ’

पृष्ठ....१८

१९७८ च्या ‘ माणूस ’ दिवाळी अंकातील गोहरबाईंची बालगंधर्वांबद्दलची मुलाखत प्रसिद्ध झाली होती. अशा प्रकारच्या मुलाखती भावी काळात लिहिल्या जाणाऱ्या इतिहासाची साधनेंही ठरू शकतात आणि म्हणूनच अशा मुलाखतींमध्ये सत्याचा विपर्यास झालेला आढळला तर त्याची दखल घेणं आवश्यक असतं.

## ‘ पुन्हा एकदा गोहर ’

पृष्ठ....९

# साप्ताहिक माणूस

वर्ष अठरावे–अंक छत्तिसावा

३ फेब्रुवारी १९७९

मूल्य ७५ पैसे

संपादक
**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**

¤

वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४ ३४५९

¤


## सप्रेम नमस्कार

## पोकळ सहानुभूती नको !

¤ २ डिसेंबर ७८ च्या साप्ताहिक 'माणूस' मध्ये 'कोंडीत सापडलेल्या वैज्ञानिकांसाठी' हे पत्रक प्रसिद्ध झाल्यापासून माझ्या पत्त्यावर अनेक पत्रे आली आणि अजून येत आहेत. त्यात अनेक सूचना आहेत. त्याबद्दल हा खुलसा करावासा वाटतो आहे. हाच खुलासा हे पत्रक जिथे जिथे प्रसिद्ध झाले त्या त्या साप्ताहिकांना मासिकांना व पेपर्सना पाठवीत आहे याची कृपया नोंद घ्यावी.

या पत्रात साधारणपणे खालीलप्रमाणे विचार मांडलेले असतात.

१ : काहींनी आम्हा कोंडीत सापडलेल्या वैज्ञानिकांना आणि तंत्रज्ञांना वैयक्तिक पातळीवर आर्थिक मदत देऊ केली आहे. कारण आमच्यापैकी काही वैज्ञानिकांची अन्नान्नदशा आहे.

२ : काहींनी आमचे बंद पडलेले उद्योग पुन्हा चालू करण्यासाठी जनतेने पैसा उभा करावा आणि आमचे पुनर्वसन करावे असे सुचवले आहे. त्याची सुरुवात म्हणून स्वतः पैसे देऊ केले आहेत.

३ : काहींनी स्वतःचे वजन खर्च करून अर्थसहाय्य मिळवून देण्याचे आश्वासन दिले आहे. (त्यांच्या ओळखीचे कोणी तरी आहे. मंत्री, खासदार, आमदार, बँकांचे डायरेक्टर्स, चेअरमन, बडे अधिकारी, बडे उद्योगपती इत्यादी इत्यादी).

४ : काहींनी समाजातील श्रीमंत दानशूर व्यक्तींना आवाहन केलेले आहे. श्रीमंत उद्योगपतींनी आम्हा संशोधकांना दत्तक घ्यावे असे विचार व्यक्त केलेले आहेत.

५ : काहींना सध्याच्या जनता सरकारच्या औद्योगिक धोरणाबद्दल विश्वास वाटतो आहे. ग्रामीण उद्योगधंदे, लघुउद्योगजक यांना आता सुवर्णदिन आलेले आहेत, येतील. त्यातूनच आपल्या देशाची भरभराट होणार आहे वगैरे वगैरे. काहींना श्री. जॉर्ज फर्नांडिस हे प्रश्न सोडविण्यास समर्थ आहेत असे वाटते आहे.

६ : तर काहींनी मुख्यमंत्री फंड, पंतप्रधान फंड इत्यादी फंडांतून मदत मिळविण्याचे सुचविले आहे व त्यासाठी व्यक्तिशः ते प्रयत्न करणार आहेत.

७ : तर काहींनी नोकऱ्या देऊ केल्या आहेत.

लोकहो, मित्रांनो आम्ही तुमच्या भावना समजू शकतो; पण...

आभाळच फाटले आहे. अशी ठिगळे लावून काम चालणार नाही. प्रश्न आमच्या व्यक्तिगत पुनर्वसनाचा नाही आमचे अपयश, आमची कोंडी अपवादात्मक नाही. ही कोंडी सार्वत्रिक आहे. केवळ नफ्यासाठी उत्पादन करणाऱ्या भांडवलशाही समाजव्यवस्थेचा हा परिणाम आहे. ही व्यवस्था बदलून टाकण्यासाठी क्रांतिसाठी माणसे उभी करण्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा उपयोग कुठे आणि कसा करता येईल ते आता पाहू या.

खरे म्हणजे आम्हाला तुम्ही लोकांनी लाथा घातल्या पाहिजेत. उगाच सहानुभूती दाखवू नका. ऑलरेडी या देशातील उपाशी जनतेने आमच्या महागड्या तांत्रिक शिक्षणावर प्रत्येकी १ लाख रुपये कमीत कमी खर्च केलेले आहेत. (माझे शिक्षण माझ्या वडिलांनी केले असे म्हणणाऱ्या तरुणाच्या कमरेत चार लाथा घालाव्याश्या वाटतात.)

शिक्षण झाल्यानंतरसुद्धा आम्ही कृतघ्नपणे बड्या उद्योगपतींकडे आमची अक्कल गहाण टाकली आणि वेश्याव्यवसाय सुरू केला आणि या देशातील गरीब जनतेचे शोषण करण्यासाठी हातभार लावला.

काहींनी बँकांचे कर्ज काढून लघुउद्योग सुरू केले. बँकांची कर्जे म्हणजे सामान्य जनतेचाच पैसा. उद्योग सुरू करताना कारखानदार बनण्याचीच आग होती. समाजकार्य वगैरे

सब झूट आहे. आमचे संशोधनच अशा प्रकारचे होते की, ते प्रचलित उत्पादनव्यवस्थेत बसत नव्हते. ते जर आधी आम्हाला समजले असते तर आमच्यापैकी किती जण या फंदात पडले असते? आम्ही मूर्ख जे संशोधन ग्राहकाच्या उपयोगी आहे; परंतु ज्यातून नफा मिळणार नाही असे संशोधन बाजारपेठेत अट्टाहासाने आणण्याचा प्रयत्न केला. प्रवाहाच्या विरुद्ध पोहण्याचा हा प्रकार होता; परंतु **मित्रहो, ते पोहणे जाणीवपूर्वक नव्हते. खरी प्रेरणा नफा मिळविण्याची आणि बडे कारखानदार बनण्याचीच होती.**

व्हायचे तेच झाले. दणके बसले, अन्नान्नदशा झाली मित्र, नातेवाईक दूर पळाले. मग सरकारदरबारी अर्ज – विनंत्या झाल्या, दानशूर, श्रीमंत व्यक्तींच्या पाया पडणे झाले. गल्लीपासून दिल्लीपर्यंत सापडेल त्या पुढाऱ्याचे पाय धरणे झाले. रगड आश्वासने मिळाली. पाठीवरून पाठ दुखेपर्यंत हात फिरले आहेत. 'तुमच्यासारख्या संशोधकांची आज देशाला गरज आहे. सर्व बाजूंनी तुम्हा लोकांना मदत मिळायला पायजेलय.' (आता आठवले म्हणजे तोंडात कचकचीत शिवीच येते!)

आता सरकारने मदत करावी, बँकांनी कर्जे माफ करावीत, श्रीमंत दानशूर व्यक्तींनी दत्तक घ्यावे इत्यादी इत्यादी. हे मार्ग शक्य आहेत काय? या समाजव्यवस्थेत भांडवलदारधार्जिणे सरकार असते ते आपल्याच पायावर धोंडा कसा पाडून घेईल? शिवाय मंत्री–संत्री आमदार–खासदार हे सर्व रेसचे घोडे आहेत. त्यांचे मालक, त्यांच्यावर पैसे लावणारे लोक वेगळेच आहेत! या रेसच्या घोड्यांकडून काही अपेक्षा करता येईल का?

या उत्पादनव्यवस्थेत ज्या तंत्रामुळे मानवाचे आयुष्य सुखी होईल. परंतु उत्पादकाला नफा मिळणार नाही, अशी तंत्रे विकसित होणार नाहीत. त्यांचा प्रसार कोणी करू शकणार नाही. उदाहरणार्थ समजा, आम्ही एखादी अशी सूर्यचूल तयार केली की ती कोणाही गरीब स्त्रीला घरच्या घरी तयार करता येईल. हे तंत्रज्ञान जनतेपर्यंत पोहोचविणे, प्रात्यक्षिके देणे, त्यात सुधारणा करणे हे काम कोण करू शकेल? सध्याची नफ्यावर आधारलेली उत्पादनव्यवस्था आणि वितरणव्यवस्था हे काम करू शकेल? कुणी या चुलींचा कारखाना काढतो म्हटले तरी त्यात फायदा मिळण्याची शक्यता नाही. कारण तंत्र अगदी सोपे आहे. (Do it yourself type आहे.) त्यामुळे कितीही पैसे मिळाले, समजा अर्थसहाय्य मिळाले तरी आमचे बंद पडलेले उद्योग पुन्हा बंद पडण्यासाठीच सुरू होतील. एकदा मूर्खपणा झाला तेवढा बस्स झाला! कारखाना चालविणे आणि समाजकार्य करणे ह्या गोष्टी एका वेळेस शक्य नाहीत. जिथे नफ्यासाठी उत्पादन नाही अशा समाजवादी राष्ट्रामध्येच हे शक्य आहे.

मला त्या बेनेगलच्या 'निशांत' पिक्चरमधील मास्तर आमचा प्रतिनिधी वाटतो. हा मास्तर गावात चाललेले जमीनदारांचे अत्याचार उघड्या डोळ्यांनी पहात असतो. क्वचित दबल्या आवाजात नापसंतीही व्यक्त करतो. जेव्हा त्याची स्वतःची बायको जमीनदार पळवितात तेव्हाही हा गृहस्थ त्या बनेल पोलिसपाटलाकडे, नंतर मामलेदार, कलेक्टर, कमिशनर अशा नोकरशहांकडे, त्यानंतर चोर–वकिलांकडे, वर्तमानपत्रांकडे क्रमाक्रमाने जातो व दाद मागतो. त्याचा या सनदशीर मार्गांवर मध्यम वर्गीय विश्वास असतो. शेवटी परमेश्वराकडे दाद मागतो. सगळ्यांनी दांडू दाखविल्यानंतरच त्याला खरा मार्ग सापडतो. म्हणजे मध्यम वर्गीय माणसाला खऱ्या मार्गावर येण्यासाठी या सगळ्या अनुभवातूनच जावे लागते.

आम्हीही त्या मास्तरप्रमाणेच ते औद्योगिक अधिकारी, त्या सतराशेसाठ औद्योगिक कार्पोरेशन्स्, त्यातील नोकरशहा, त्या बँका, त्यांचे अधिकारी, ते डायरेक्टर्स, ते चेअरमन्स्, चोर वकील, न्यायालये, वर्तमानपत्रे सगळीकडे दाद मागितली. उगाचच सगळ्यांवर विश्वास ठेवला! त्या सगळ्यांनी दांडू दाखवला!

आता मला कुणी मुख्यमंत्र्यांना, उद्योगमंत्र्यांना भेटायला सांगते त्या वेळी त्या मध्यम वर्गीय बालबुद्धीची कीव करावीशी वाटते. इतकी मारली गेली तरी अक्कल कशी येत नाही?

तेव्हा मित्रांनो, राग मानू नका! सर्व दरवाजे केव्हाच बंद झाले आहेत हे आम्हाला जाणवू द्या. उगाच सहानुभूती दाखवू नका. बुडत्याला काडीचा आधार त्याप्रमाणे आमच्या मध्यम वर्गीय मनाला तुमच्या सहानुभूतीची भुरळ पडेल. त्या आधाराकडे आम्ही धावत सुटू. तुम्ही आम्हाला वेळीच लाथा घाला! आता आम्हाला इकडे तिकडे प हायला लावू नका, तुम्हीही पाहू नका! त्या मास्तरने जसे केले तसे आम्हाला आता करू द्या! **तळच्या वर्गात काम करण्यासाठी, ती माणसे संघर्षासाठी उभी करण्यासाठी आमचे विज्ञान आणि तंत्रज्ञान आता उपयोगी पडू द्या!**

**यामध्ये कर्तव्य म्हणून तुम्हास काही आर्थिक मदत पाठवायची असल्यास जरूर पाठवा. सहानुभूती-उपकार म्हणून मुळीच नको!**

**साल्यांनो तुमच्याच मुक्तिलढ्याचे हे काम आहे.**

**आपला दोस्त,**
**अरुण देशपांडे**
**सोमनाथ प्रकल्प**
**व्हाया मूल**
**जि. चंद्रपूर**
**महाराष्ट्र राज्य**

## रचनात्मक काम

'माणूस'च्या १३ जानेवारी १९७९ च्या अंकातील सुनीति कुलकर्णी यांचे पत्र वाचले. त्याआधीच्या ३० डिसेंबर १९७८ च्या आपल्या संपादकीय लेखात दिलेला इशारा देखील वाचला होताच. या दोन्हींच्या पार्श्वभूमीवर मनात जे विचार आले ते पुढे कळवत आहे.

प्रथमच सांगायला हवे की, पत्ररूपी कथनातून, महाराष्ट्र छात्र युवा संघर्षवाहिनीच्या कार्यकर्त्यांना जे वर्ध्यात सांगायचे होते ते, सुनीति कुलकर्णी यांनी फार चांगल्या रीतीने 'माणूस'च्या वाचकांना सांगून टाकले आहे. तेच कथन 'साधना' साप्ताहिकाकडे पाठवून, एकच मजकूर दोन वेगवेगळ्या साप्ताहिकांत प्रकाशित होण्याचा मानदेखील त्यांना मिळाला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. 'माणूस'च्या व 'साधने'च्या वाचकांचे थोडे-फार लोकशिक्षण त्यामुळे झाले आहे असे मी मानतो.

याबाबत मला असे वाटते की, आज अशा

शांततापूर्ण म्हणा किंवा मूक म्हणा– कोणत्याही निदर्शनाची गरज नसून तरुणांनी स्वतः काही रचनात्मक काम संघटित होऊन करून दाखवण्याची गरज आहे. लोकशिक्षण त्यातूनच होईल असा माझा विश्वास आहे. दुर्दैवाने असे काही काम करून दाखवायला ज्या प्रमाणात तरुण पुढे यायला हवेत ते येतच नाहीत. छात्र युवा संघर्षवाहिनीचे कार्यकर्तेदेखील असले प्रत्यक्ष काम करण्यासाठी किती संख्येत पुढे येतील याची मला शंका आहे. कारण या प्रकारच्या कामाला व केलेल्या कामाची काय फळे आली ते ठरायला फार वेळ द्यावा लागतो. हा वेळ व हा धीर या तरुणांपाशी असणे कठीण. मग राहता राहिला एकच मार्ग. संघर्ष हा मुळी वाहिनीच्या नावात आहेच. तेव्हा निदर्शने त्यात आलीच. मग लोकशिक्षणाच्या गोंडस नावाखाली निदर्शने करायला पूर्ण मोकळीकच मानली तर बिघडले कुठे? प्रत्यक्ष काम करण्याचा किंवा लोकशिक्षणासाठी संपूर्ण वेळ देण्याचा प्रश्नही त्यात येत नाही.

खरे तर स्वातंत्र्यानंतरच्या ३०–३१ वर्षांत देशाचा चारित्र्यस्तर कुठे चालला आहे याचे भान तरी आम्हाला आहे का, असा प्रश्न पडावा अशी आजची स्थिती आहे. राजकारण हे फक्त खुर्चीसाठी–लोककारणासाठी नव्हे, हा गैरसमजच मुळी योग्य समज होऊन बसला आहे. देशातील गोंधळाचे व गैरशिस्तीचे वातावरण लवकरात लवकर संपायला हवे. नको असणारी हुकूमशाही ही नेहमी गोंधळातून व गैरशिस्तीतूनच उदयास येत असते, हे आपण 'माणूस'च्या ३०-१२-७८ च्या अंकात फार चांगल्या रीतीने समजावून सांगितले आहे. छात्र युवा संघर्षवाहिनीच्या किंवा इतरही किती तरुणांनी त्यापासून योग्य तो धडा घेतला हे पहाणे मनोरंजक ठरेल.

या पार्श्वभूमीवर संघासारख्या काही संघटनांचे काम करणारे किती तरी तरुण चटकन डोळ्यांत भरतात. जे काम करायचे त्यात स्वतःला झोकून देण्याची त्यांची प्रवृत्ती पाहिल्यावर कौतुकच वाटते; पण आम्ही करंटे असे की, ते कौतुक किंवा स्वतः काही तसले काम करण्याची गोष्ट तर दूरच. उलट त्यांच्या नावाने खडे फोडत बसून स्वतः 'संघर्ष' हे आमच्या वाहिनीच्या नावात असल्याने, संघर्ष ही मुळी आमची मक्तेदारी, असा काहीसा गैरसमज मनाशी बाळगून त्यानुरूप कृती करीत बसतो. वर आणखी म्हणायचे–निदर्शनांची हौस नाही; पण... पण आम्ही मजदूर आहोत. आज देशात काही योजनाबद्ध रचनात्मक काम करायचे म्हटले तर जागोजागी अनुत्साह आढळतो. छात्र युवा संघर्षवाहिनीने बिहारमध्ये आणीबाणीत व त्याआधी बरेच काम केले. बिहारमध्येच आता वाहिनीला काही काम नाही असे मानायचे तरी कसे? आजही बिहारातील भूमिहीन किसानांवरचे जमीनदारांचे अत्याचार वाचून मन आक्रंदून उठते. आपल्याच देशात असले प्रकार अजून चालू आहेत हे वाचून खरे वाटत नाही. हे प्रकार व असले अत्याचार, निदर्शने वगैरे करून संपणारे नाहीत हे आपल्याला पटेल असे मी मानतो. तर तेथे निश्चित अशा योजनेबरहुकूम काही काम करणे आवश्यक आहे. जनता सरकार तेथे आहेच. तेव्हा परिस्थितीचा पूर्ण अभ्यास करून तेथे काही प्रत्यक्ष कामाची सुरुवात केली व तसा वेळ दिला तर काही परिणाम होईल असे वाटते. असो.

१४ जानेवारी — प्रकाश लेले, नागपूर

---

कापूस एकाधिकार खरेदी योजना

# काहीशी उशीरा सुरू झालेली ही योजना आता सुरळीत पार पडत आहे....

कापूस एकाधिकार खरेदी योजना म्हटली म्हणजे अनेकांना वेगवेगळ्या गोष्टी आठवत असतील. नियतकालिकांमध्ये तर ही योजना सुरू झाल्यापासून (१९७२-७३) अनेक लेख आले. राज्यविधिमंडळाच्या दोन्ही गृहांत जोरदार भाषणं झाली. या वर्षीदेखील ही योजना सुरू होण्याआधी अनेक तर्ककुतर्क लढवले गेले. एवढंच नव्हे तर या योजना-प्रश्नावर पवार मंत्रिमंडळाचं तारू फुटणार, असंही भाकित करण्यात आलं; पण काहीशी उशीरा चालू झालेली ही योजना आता सुरळीतपणे पार पडत आहे.

विदर्भातल्या दौऱ्यात या योजनेसंबंधी मी जवळजवळ शंभर कास्तकारांशी बोललो. या कास्तकारांत अगदी दोन एकरांपासून ते दोनशे एकरांत कापूस पिकवणाऱ्यांचा समावेश होता. यातल्या अक्षरशः प्रत्येकानं या योजनेचं स्वागत केलं आहे आणि सर्वांनीच ही योजना कुठल्याही कारणास्तव बंद होता कामा नये, असं ठामपणे सांगितलं. अर्थात यामागं अनेक कारणं आहेत. यातलं सर्वांत प्रमुख कारण म्हणजे या वर्षी कापसाला देण्यात आलेला भाव. यंदा अगदी निकृष्ट अशा जरिला कापसालाही क्विंटलला एकशेपंचवीस रुपये तर सुविनच्या सुपर जातीला हाच दर पाचशेनव्वद इतका देण्यात आला आहे. योजनेच्या पहिल्या वर्षाच्या तुलनेनं या वेळचे भाव क्विंटलमागे चाळीस ते साठ रुपयांनी अधिक आहेत.

दुसरं प्रमुख कारण म्हणजे कापसाची मोजणी झाल्यापासून चोवीस तासांत प्रत्येक कास्तकाराला चेक मिळतो आणि रोख रक्कम बँकेकडून ताबडतोब देण्याची सोय आहे. याआधीच्या योजनांमध्ये चेक मिळण्यास आठ ते पंधरा दिवस लागते. योजना नव्हती तेव्हा व्यापाऱ्यांनी-शेतकऱ्यांनी कशी फसवणूक केली याच्या अनेक करुण कहाण्या या दौऱ्यात ऐकायला मिळाल्या. कित्येक व्यापारी चार-चार महिने पैसे देत नसत. त्या काळात कास्तकार बिचारा व्यापाऱ्याकडं हेलपाटे घालूनच दमायचा. याहून भयानक प्रकार

पृष्ठ २३ वर

## मुंबई वार्ता

विनय सहस्रबुद्धे

# □ कवि ' अज्ञेय '

प्रसिद्ध कन्नड साहित्यिक के. शिवराम कारंथ यांना ज्ञानपीठ पुरस्कार देण्याचा भव्य सोहळा गेल्या पंधरवडयात मुंबईत पार पडला. प्रथमच दिल्लीबाहेर हा सोहळा झाला व ही नवी प्रथा स्वागतार्हही आहे. या समारंभापाठोपाठ १९७८ च्या ज्ञानपीठ पुरस्काराची घोषणा करण्यात आली असून सुप्रसिद्ध हिंदी कवि, साहित्यिक आणि नवभारत टाइम्सचे यशस्वी संपादक श्री.सच्चिदानंद वात्स्यायन ऊर्फ ' अज्ञेय ' यांना हा पुरस्कार मिळाला आहे.

१९६२–७१ या कालावधीतील सर्वोत्कृष्ट सृजनशील साहित्यकृती म्हणून श्री. अज्ञेय यांच्या ' कितनी नावों में कितनी बार ' या काव्यसंग्रहाची निवड परीक्षण मंडळाने केली आहे. ' आँगन के पार द्वार, ' आणि ' भग्नदूत ', ' अरि ओ करुणा प्रभामय ' इ. त्यांचे अनेक काव्यसंग्रह समीक्षकांच्या कसोटीला उतरले आहेत आणि साहित्यातले अनेक मानसन्मान त्यांनी मिळविले आहेत. एकूण १४ काव्यसंग्रह, ११ कथासंग्रह, ३ कादंबऱ्या, १० निबंध, टीकाग्रंथ, नाटक आणि अनेक प्रवासवर्णने एवढी श्री. वात्स्यायन यांची प्रचंड ग्रंथसंपदा आहे. एक व्यासंगी पत्रकार म्हणूनही त्यांचा लौकिक असून अनेक हिंदी साप्ताहिके व ' एव्हरीमन्स ' हे जे. पीं चे इंग्रजी साप्ताहिक इ. ना श्री. वात्स्यायन यांच्या कुशल संपादनाचा लाभ मिळाला आहे.

आपल्या जीवनाइतकेच श्री. वात्स्यायन यांचे काव्यही बहुरंगी आहे. तरुणपणात त्यांच्या विचारशील मनाला अस्तित्ववादाने आकर्षिले होते, पण नंतर त्यांच्या जपानमधील वास्तव्यात गौतम बुद्धाचा अनुयायी झेन याच्या शून्यवादी संप्रदायाकडे ते ओढले गेले. विशेषतः ' अरी ओ करुणा प्रभामय ' या त्यांच्या काव्यसंग्रहात या ' झेन तत्त्वज्ञानाचे ' प्रतिबिंब अधिक ठळकपणे जाणवते.

जीवनाच्या व एकूण साहित्यिक कर्तृत्वाच्या तिसऱ्या टप्प्यात कवि ' अज्ञेय ' अधिक व्यक्तिवादी ( Individualistic ) बनत आहेत असे अनेक टीकाकारांना वाटते. याच काळात एक प्रयोगवादी कवी ही त्यांची प्रतिमा अधिक प्रस्थापित झाली. व्यक्तिवाद, जिवंत अनुभूती आणि स्वातंत्र्य या तीन कल्पना किंवा तीन विचारधारा अज्ञेय यांच्या काव्यात प्रतिबिंबित झाल्या आहेत.

हिंदीतील नवकाव्याच्या चळवळीला अधिक आशय प्राप्त करून देण्यात ' अज्ञेय ' यांचा वाटा महत्त्वाचा आहे. काही प्रमाणात व काही संदर्भात मराठीतील बा. सी. मर्ढेकरांशी अज्ञेय यांच्या कामगिरीची तुलना करता येईल. दोघांच्या काव्यातला एक ठळक फरक म्हणजे अज्ञेय यांच्या काव्यात विविधता असली तरी काव्यातील प्रतिभा आणि कल्पनांचे संदर्भक्षेत्र साधारणतः मर्यादित आहे. याउलट मर्ढेकरांचे विषयक्षेत्र मर्यादित आहे तर संदर्भक्षेत्र विस्तृत.

कवि अज्ञेय नवकवी म्हणून प्रसिद्ध असले तरी आपल्या बऱ्याच मराठी नवकवितांमध्ये असलेली दुर्बोधता त्यांच्या काव्यात नाही. सोप्या पण अर्थवाही शब्दरचनेतून आणि प्रामुख्याने निसर्गातील व मानवी व्यवहारातील प्रतिमांच्या आधारे कविता आशयसंपन्न करण्यात ' अज्ञेय ' कुशल आहेत.

अज्ञेय यांच्या मते काव्य म्हणजे आनंदसाधना आहे. विशेषतः त्यांच्या निसर्ग कवितांमध्ये जो एक आगळा जिवंतपणा आढळतो त्यातून या आनंदयात्री कवीची बहरलेली, फुललेली रसिकता स्पष्ट होते. शिवाय निसर्गचित्र रेखाटताना केवळ वर्णनाच्या आधारे छायाचित्र उभे करण्यात ते रमत नाहीत तर या चित्रामागचा खरा अर्थ, अत्यल्प शब्दांत सूचकतेच्या आधारे उकलून दाखवितात. त्यांच्या प्रेम–काव्याबद्दलही हेच सांगता येईल. प्रेमभावनांचा आकर्षक फुलोरा उभा करण्याऐवजी प्रेमातील उदात्तता आणि पवित्रता यांची डूब देण्याचा प्रयत्न त्यांच्या प्रेम-काव्यात जाणवतो.

जिवंत अनुभव ही अज्ञेय यांच्या काव्याची आधारशिला आहे. अनुभवातून गवसलेले सत्य हेच त्यांनी महत्त्वाचे मानले आहे. कोणताही अनुभव त्याच सच्चेपणाने व त्याच प्रामाणिकपणे ते मांडतात. एक उल्लेखनीय उदाहरण त्यांच्या ' बद्ध ' या कवितेचे !

१९३०–३२ या काळात अज्ञेय यांना चळवळीपायी कारावास भोगावा लागला होता. शृंखलाबद्ध कैद्याचे परावलंबित्व आणि दुर्बलता यांची त्यांना झालेली जाणीव त्यांनी अत्यंत साधेपणाने व संयमाने व्यक्त केली आहे. कोणताही आक्रोश किंवा आक्रंदन आणि त्यामुळे येणारा भडकपणा त्यात दिसून येत नाही.

अज्ञेय यांची कविता प्रामुख्याने चिंतनशील असली तरी तिचे स्वरूप वारंवार बदलत गेले आहे. प्रारंभीच्या काळात वैचारिक सखोलता हे त्यांच्या काव्याचे मुख्य वैशिष्टय होते. नंतर मात्र विशुद्ध भाव कविता (Lyric) अज्ञेय यांनी सादर केल्या व त्यांपैकी बऱ्याच कविता खूप गाजल्या. भावरेखाटन आणि चिंतन यांची अशी काही सांगड अज्ञेय यांच्या कवितेत दिसून येते की, त्यामुळे कविता आशयघन होते; पण म्हणून किचकट किंवा कठीण होत नाही.

अज्ञेय यांच्या कवितेतील जीवनविषयक चिंतन अधिक मोहक आहे. जीवनाचा अर्थ समजून–उमजून त्यातला आनंद अनुभवावा असे त्यांना वाटते. एके ठिकाणी अज्ञेय म्हणतात, " मी कवितेकडे उपयुक्ततावादी दृष्टीने पहात नाही. कारण माझी कविता तेव्हा उपयुक्त ठरेल जेव्हा मी स्वतः उपयुक्त असेन. माझ्या जीवनाला तेव्हा पूर्णता येईल जेव्हा मी जीवनासाठी पूर्णतः समर्पित झालो असेन. म्हणूनच महत्त्व आहे ते जीवनातील निर्भेळ आनंदाला ! " ह्या विचारांशी मिळत्या–जुळत्या एका कवितेत ते म्हणतात–

जियो उस प्यार में, जो मैंने तुम्हे दिया है,

पृष्ठ २४ वर

# जनतापक्ष

## फूट टळली; पण पुढे ?

वा. दा. रानडे

चरणसिंग पुन्हा मंत्रिमंडळात आले. जनता-पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांमध्ये गेले सात महिने चालू असलेला संघर्ष मिटला. पक्षात फूट पडणार असे वाटत होते तो प्रसंग टळला. पक्षाचे ऐक्य बाह्यतः टिकले; पण नेत्यांच्या मनाची जुळणी खरोखर होणार आहे का ? आणि पक्षाचे सामर्थ्य वाढून यापुढे तरी आपसात भांडण्यात आपली शक्ती वाया न दवडता देशापुढील निकडीचे प्रश्न सोडविण्याकडे जनता-नेते लक्ष केंद्रित करणार आहेत का ? हा पक्षाच्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या दृष्टीनेच केवळ नव्हे तर जनता पक्षास निवडून देणाऱ्या सर्वसामान्य नागरिकाच्या दृष्टीनेही महत्त्वाचा प्रश्न आहे.

संघर्षाचे प्रश्न निश्चित तात्त्विक भूमिकेच्या आधारे सोडविण्याचा प्रयत्न झाला असे दिसत नाही. सामुदायिक जबाबदारीच्या तत्त्वाचा भंग केला म्हणून पंतप्रधान मोरारजीभाईंनी चरणसिंगांचा राजिनामा मागितला होता. ही आपली चूक चरणसिंगांनी मान्य केलेली नाही आणि ती मान्य केली नसताना त्यांना पुन्हा मंत्रिमंडळात घेण्यास मोरारजीभाईंनी तयार होणे म्हणजे त्यांचा राजीनामा मागण्यातच मोरारजीभाईंनी चूक केली असेच सूचित होत नाही का ? चरणसिंगांनी चूक मान्य करायला हवी असा आग्रह जनता पक्षाच्या एकाही ज्येष्ठ नेत्याने जयप्रकाश आणि आचार्य कृपालनींनी सुद्धा धरला असल्याचे दिसत नाही. ही गोष्ट कोणालाच कशी खटकली नाही ? खटकली नसेल असे कसे म्हणावे ? पण पक्षाचे ऐक्यापुढे त्यांना ही गोष्ट दुय्यम महत्त्वाची वाटली.

दुसरा प्रश्न पंतप्रधानांचे चिरंजीव कांतिलाल देसाई यांच्यावरील भ्रष्टाचारांच्या आरोपांचा. या आरोपांची चौकशी झाली पाहिजे अशी चरणसिंगांची मागणी. वास्तविक आपल्या मुलासंबंधी आरोप केले जातात तेव्हा मोरारजीभाईंनी त्यात कोणत्याही प्रकारे लक्ष न घालता तो प्रश्न राष्ट्रपतींनी सुचविलेल्या एखाद्या निःपक्षपाती व्यक्तीकडे सोपवायला हवा होता. निश्चित स्वरूपाचे लेखी आरोप करा, ते छाननीसाठी मी सुप्रीम कोर्टाच्या सरन्यायाधीशांकडे पाठवीन अशी भूमिका त्यांनी घेतली. काटेकोर दृष्टीने विचार केला तर ती चुकीची म्हणता येणार नाही. विरोधी पक्षाने या प्रश्नावर राज्यसभेचे कामकाज अनेक दिवस बंद पाडले. या प्रश्नाबद्दल इतकी पोटतिडीक या मंडळींना आहे तर मोरारजीभाईंनी म्हटल्याप्रमाणे निश्चित स्वरूपाचे लेखी आरोप त्यापैकी एकानेही का सादर केले नाहीत ? आरोपांच्या चौकशीपेक्षा या प्रश्नाचे राजकीय भांडवल करण्याचाच विरोधी पक्षाचा—विशेषतः इंदिरा काँग्रेसचा—उद्देश आहे, हे यावरून उघड दिसते. लोकपाल—बिल तातडीने पास करून घेऊन आम्ही प्रकरण त्यांच्याकडे सोपवीत आहोत, असे मोरारजीभाईंनी जाहीर केले असते तरी विरोधकांना टीकेला जागा राहिली नसती. या प्रश्नातून काय मार्ग काढता येईल याचा विचार करण्यासाठी मंत्र्यांची एक समिती मंत्रिमंडळाने नेमली. काही मंत्री मोरारजीभाईंच्या बाजूचे तर काही मोरारजीविरोधी, तेव्हा ही समितीसुद्धा कितपत तोडगा काढू शकेल याची शंका वाटते.

तिसरा प्रश्न मंत्रिमंडळाच्या पुनर्घटनेच्या बाबतीतील पंतप्रधानांच्या अधिकाराचा. ब्रिटिश लोकशाही प्रथेप्रमाणे पंतप्रधानांना या बाबतीत पूर्ण मोकळीक असली पाहिजे; पण ब्रिटिश लोकशाहीचा दाखला घेताना दोन्ही देशांतील परिस्थितीत असलेला फरकही विचारात घेतला पाहिजे. तेथे बहुमतवाल्या पक्षाचा नेता पंतप्रधान होतो. हा पक्ष एकजिनसी असतो. तसेच ब्रिटिश समाजाची घडणही आपल्यापेक्षा निराळी आहे. आपल्याकडे अनेक भाषा, धर्म, जाती-जमाती व वर्ग आहेत. या सर्वांना योग्य प्रतिनिधित्व देण्याचा विचार पंतप्रधानांना करावा लागतो. सत्तारूढ पक्ष अनेक घटकांचा बनलेला असेल तर हे काम आणखी कठीण होते. मंत्रिमंडळात सर्व घटकांना योग्य प्रतिनिधित्व द्यावे लागते. या सर्व गोष्टी लक्षात घेता पंतप्रधानाला आपल्या मताप्रमाणे मंत्रिमंडळ बनविण्याच्या बाबतीत फारसे स्वातंत्र्य रहात नाही.

दोन गोष्टींबाबत मोरारजीभाई ठाम राहिलेले दिसतात. एक चरणसिगांना गृहमंत्रिपद पुन्हा द्यावयाचे नाही आणि दुसरे उपपंतप्रधानपद निर्माण करायचेच असेल तर ते एकट्या चरणसिंगांना द्यावयाचे नाही. त्यांच्याबरोबरीने जगजीवनरामबाबूंनाही द्यावयाचे. जैसे थे स्थिती पुन्हा निर्माण केल्याशिवाय आपण मंत्रिमंडळात पुन्हा येणार नाही अशी चरणसिंगांची सुरुवातीची अट होती. ही अट मान्य करावयाची म्हणजे चरणसिंगांना पुन्हा गृहमंत्रिपद द्यायला हवे, राजनारायण यांना मंत्रिमंडळात घ्यावयास हवे आणि भारतीय लोकदलाच्या ज्या चार मंत्र्यांनी राजीनामे दिले त्यांनाही त्यांची पदे पुन्हा द्यावयास हवीत. मोरारजीभाईंनी हे अमान्य केले. किसान मेळावा भरवून आपल्या मागे केवढे सामर्थ्य आहे, याचे प्रदर्शन चरणसिंगांनी केले होते; पक्षातून आपला गट बाहेर पडेल अशी धमकी दिली तर फूट टाळण्यासाठी आपल्या साऱ्या अटी मान्य होतील असा चरणसिंगांचा आडाखा होता; पण मोरारजीभाई या धमकीला दबले नाहीत. चरणसिंगांना मंत्रिमंडळात घेण्याची त्यांची तयारी होती पण ती स्वतःच्या अटींवर, चरणसिंगांच्या अटीवर नव्हे आणि आपल्या अटींबाबत अखेर माघार घेण्यास चरणसिंग तयार झाल्याचे दिसते. तसे करताना एक गोष्ट मात्र त्यांनी केली. गृहमंत्रिपद आपणास मिळणार नसेल तर ते जगजीवनबाबूंनाही देऊ नका असा आग्रह त्यांनी धरला.

चरणसिंग पुन्हा मंत्रिमंडळात येण्याने सारे काही ठीक होऊन जनता पक्षाची घडी नीट बसणार आहे का ? आपण मंत्रिमंडळात जाणार नाही व भालोदचा मेळावा ठरल्याप्रमाणे २८ व २९ जानेवारीस होईल असे राजनारायण यांनी जाहीर केले होते; पण चरणसिंग मंत्री झाल्यानंतर आता हा मेळावा रद्द करण्यात आला आहे.

केंद्रातील पेचप्रसंग मिटतो न मिटतो तोच उत्तर प्रदेशात नवा पेचप्रसंग उद्‌भवला.

मुख्यमंत्री रामनरेश यादव यांनी चार मंत्र्यांचे राजीनामे मागितले. यांपैकी दोघे माजी भालोदचे व दोघे माजी जनसंघाचे आहेत. या मंत्र्यांनी आपला विश्वास गमावला आहे, त्यांचे सहकार्य आपणास मिळत नाही अशी त्यांचा राजीनामा मागण्याची कारणे मुख्यमंत्र्यांनी दिली आहेत. चरणसिंगांशी विचारविनिमय केल्यानंतर मुख्यमंत्री यादव यांनी ही कारवाई केली. त्या अर्थी त्यांचा पाठिंबा या कारवाईस असला पाहिजे. ज्या दोन भालोद मंत्र्यांचा राजीनामा मागितला ते दिल्लीस झालेल्या किसान-मेळाव्यास उपस्थित नव्हते. दुसरे कारण यांपैकी गृहमंत्री रामसिंग मुख्यमंत्रिपदासाठी यादव यांचे प्रतिस्पर्धी आहेत. पक्षात बंडखोर गटाचे बहुमत झाले तर त्यांचे नाव मुख्यमंत्रिपदासाठी जवळजवळ निश्चित मानले जाते. स्थानिक स्वराज्यमंत्री गणेश दत्त बाजपेयी यांचा राजीनामा मागण्याचे आणखी एक कारण म्हणजे मुख्यमंत्री यादव यांच्या राखीव जागासंबंधीच्या धोरणावर मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्यांनी कडक टीका केली होती. राखीव जागांच्या प्रश्नावर बिहारमध्ये ज्याप्रमाणे जनता पक्षात बंडखोर गट निर्माण झाला आहे तसा उत्तर प्रदेशातही झाला आहे. गणेशदत्त बाजपेयींचे मुख्यमंत्र्यांशी मतभेद काही नव्यानेच उद्भवलेले नाहीत. गेल्या मेमध्येच त्यांच्याकडचे मजूर आणि अबकारी खाते काढून घेऊन त्यांना स्थानिक स्वराज्यखाते दिल्याबद्दल राजीनामा देण्याची परवानगी बाजपेयींनी पंतप्रधान मोरारजीभाई आणि पक्षाध्यक्ष चंद्रशेखर यांच्याकडे मागितली होती.

मुख्यमंत्री यादव यांच्या कारवाईबद्दल जनता पक्षाचे सरचिटणीस रामकृष्ण हेगडे यांनी त्यांच्याकडे खुलासा मागितला आहे. पक्षाचे ऐक्य होत असताना त्यांनी अशी कृती करावी हे तर योग्य नाहीच; पण पक्षश्रेष्ठींच्या संमतीशिवाय मुख्यमंत्र्यांना मंत्रिमंडळात बदल करता येत नाही किंवा मंत्र्यांना काढता येत नाही, असेही हेगडे यांनी म्हटले आहे. आपले सहकारी निवडण्याच्या बाबतीत पंतप्रधान मोरारजी देसाई यांचे स्वातंत्र्य जेथे मर्यादित झालेले आहे तेथे मुख्यमंत्र्यांचेही स्वातंत्र्य मर्यादित होणार हे उघड आहे. याबद्दल दोष सदोष पक्षबांधणीस द्यावयाला हवा. आपल्याकडे जोपर्यंत एकसंध पक्षउभारणी होत नाही तोपर्यंत असेच चालावयाचे. पंतप्रधानांना व मुख्य मंत्र्यांना निरनिराळ्या घटकांचे हितसंबंध सांभाळावे लागत असल्याने मंत्रिमंडळ निवडीबाबतचे त्यांचे स्वातंत्र्य मर्यादित होते. पक्षाची बैठक बोलावून मुख्य मंत्री यादव यांनी आपल्या नेतृत्वावर विश्वासाचा ठराव पुन्हा पास करून घ्यावा, असा आदेश केंद्रीय पार्लमेंटरी बोर्ड देईल असे दिसते. गेल्या वेळी असाच प्रसंग आला तेव्हा जनसंघाच्या पाठिंब्याने यादव यांनी नेतेपद टिकविले; पण आता जनसंघाचे ९२ आमदार त्यांच्याविरुद्ध गेले असल्याने त्यांना ठराव पास करून घेणे कठीण जाईल.

केंद्रात दोन उपपंतप्रधान नेमले त्या धर्तीवर प्रत्येक राज्यात दोन नव्हे पण एक उपमुख्यमंत्री नेमावा, अशी सूचना पुढे येण्याचा संभव दिसत आहे. घटकवादाला त्यातून अधिकच खत-पाणी मिळेल. केंद्रातील वरिष्ठ नेत्यांत समझोता झाला असला तरी जनता पक्षातील घटकवाद मिटलेला नाही, हेच उत्तर प्रदेशातील घटनांनी दाखवून दिले आहे.

पक्षाच्या निवडणुकांनंतर तरी घटकवाद मिटतो का हे लवकरच स्पष्ट होईल; पण एकसंध पक्ष निर्माण झाल्याशिवाय जनता सरकारचा कार्यक्रम परिणामकारकपणे अंमलात आणता येणार नाही. पक्ष दुभंगला तर सत्ताच हातची जाईल या धोक्यामुळे ऐक्य टिकून राहील; पण केवळ सत्ता टिकविण्यापलीकडे दुसरे उद्दिष्ट नेत्यांपुढे नसेल तर संघर्ष–समझोता–पुन्हा संघर्ष–पुन्हा समझोता या चक्रातच पक्ष अडकून पडेल आणि समाजपरिवर्तनाचे उद्दिष्ट दूरच राहील. □

# नियोजन व नोकरशाही

लोकांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी भारताने १९५१ पासून योजनाबद्ध कार्यक्रम सुरू केले. हे कार्यक्रम पंचवार्षिक योजना म्हणून ओळखले जातात. स्थूलमानाने ह्या योजनेचे दोन भाग पडतात. योजनेची संकल्पना, ध्येय, उद्दिष्टे व त्यासाठी आखलेले वेगवेगळे कार्यक्रम हे पहिल्या भागात मोडतात, तर पहिल्या भागाची अंमलबजावणी दुसऱ्या भागात येते.

कार्यक्रमाची अंमलबजावणी सरकारी नोकर करत असतात. ह्या नोकरांत दोन प्रकार असतात. ज्यास इंडियन अॅडमिनिस्ट्रेटिव्ह सर्विस म्हणून संबोधिले जाते तो एक प्रकार. ह्यास सनदी नोकर म्हणू या. उरलेले सरकारी नोकर राज्यसेवा वर्गातील असतात. राज्यसेवा वर्गातील नोकरांचे नियंत्रण सनदी नोकर करतात, तर सनदी नोकरांचे नियंत्रण भारत सरकारच्या हातात असते. ह्या नियंत्रणातील फरकामुळे सनदी नोकर भयमुक्त असतात, तर राज्य सरकारी नोकर भीतिग्रस्त असतात. कामात चूक झाली तर बदली कोठे होईल, शिक्षा काय होईल, वार्षिक गुप्त अहवालात काय नोंद घेतली जाईल, वार्षिक वेतनवाढ बंद तर केली जाणार नाही ना, असे अनेक प्रश्न त्यांना भेडसावत असतात. ह्या भीतीपोटी स्वत्व विसरलेले, सहसा बुद्धी न वापरणारे, क्वचितच उपक्रमशीलता दाखविणारे व आजचा दिवस तर गेला, चला आता उद्या पुन्हा पाटचा टाकणे ह्या भूमिकेतून ते काम करत असतात. ह्यामुळे अंमलबजावणी फसते असा ग्रह होतो. हे जरी क्षणभर खरे मानले तर मग प्रश्न पडतो सनदी नोकरांचा. ह्या परिस्थितीत सनदी नोकर काय करतात? ते तर भयमुक्त असतात; पण दुर्दैवाने ह्या भयमुक्ततेचे पर्यवसान बेफिकिरीत होते. ह्याचे कारणसुद्धा असेच सबळ आहे. अंमलबजावणीची अंतिम जबाबदारी जरी सनदी नोकरांवर असते व जरी अंमलबजावणीचा बोजवारा उडाला तरी सनदी नोकर नामानिराळे राहतात. बोजवाऱ्याची जबाबदारी त्यांच्यावर कधीच टाकली जात नाही

तर चुकीबद्दल शिक्षेची बातच नको ! कारण शेवटी शिक्षा कोण फर्माविणार तर दुसरा सनदी नोकर व हे सर्व सनदी नोकर एकमेकाला सांभाळून घेतात. सांभाळण्याची मर्यादा कोठपर्यंत जाते तर जोपर्यंत सनदी नोकर खून करत नाही तिथपर्यंत. खरे वाटत नाही ? तर मग वाचाच पुढचे.

महाराष्ट्रात आदिवासी उपयोजनेचा बराच गाजावाजा चालू आहे. त्यांत आदिवासींच्या शोषणमुक्तीसाठी एकाधिकार खरेदी–योजना तर विनोदच ठरू पाहत आहे. ह्या योजनेचा तपशील पाहिला तर त्यात अंमलबजावणीच्या दृष्टीने काही अवघड आहे असे दिसत नाही. महाराष्ट्र शासनाचे बळ, राज्य सहकारी बँकेचे अमाप पैसे व तीन सनदी नोकरांचे नियंत्रण एवढे जबरदस्त मिश्रण असताना असे का व्हावे बरे ?

ह्या योजनेसाठी शासनाने आदिवासी विकास महामंडळ, पुणे ह्या सहकारी संस्थेस मुख्य एजंट म्हणून निवडले आहे. महामंडळास एक सनदी नोकर व्यवस्थापकीय संचालक म्हणून दिला आहे.ह्या संचालकास एक गाडी, २००० रु. भाड्याचा बंगला, एअर कंडिशन्ड ऑफिस व त्यामध्ये मुंबईच्या एका फर्मने तयार केलेले फर्निचर इत्यादी सवलती दिलेल्या दिसतात.शासनाच्या मुख्य सचिवांनासुद्धा असल्या सुविधा नाहीत असे म्हणतात ! ह्या महामंडळाच्या पांच कोटी रुपयांपर्यंतच्या कर्जास शासनाने हमी दिली आहे. तसेच महामंडळास आलेला सर्व तोटा भरून काढण्याचे शासनाने आश्वासन दिले आहे. गतवर्षी ४० लाख रुपये व्यवस्थापकीय अनुदान दिल्यावर महामंडळाने फक्त ३० लाख रुपयांपर्यंतच तोटा केला व एकाधिकार खरेदीची मजल १ कोटी ४० लाख रुपयांपर्यंत नेली. म्हणजे १ कोटी ४० लाखांवर ७० लाख रुपये तोटा केला. जर आदिवासींना त्यांच्या मालाच्या पोटी जास्त किंमत दिल्यामुळे हा तोटा झाला असता तर समजू शकले असते; पण ह्या तोटयातील बराच मोठा हिस्सा महामंडळाने नेमलेल्या जादा नोकरवर्गामुळे झाला असे म्हणतात. असे काही तरी घडेल म्हणून शासनाने एकाधिकारी खरेदीसाठी कोणता व किती नोकरवर्ग लावावा हे ठरवून दिले; पण ही अट धाब्यावर बसविण्यात आली आहे व त्यामुळे ३० लाख रुपये व्यर्थ खर्च झाले ! ह्या चुकीबद्दल महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकावर काहीही कारवाई करण्यात येत नसून उलट उरलेले दोन सनदी नोकर तिसऱ्या सनदी नोकरावर काहीही कारवाई होऊ नये म्हणून प्रयत्नशील आहेत. अर्थात एकूण उलाढालींच्या निम्म्या रकमेपर्यंत तोटा विनाकारण होऊ नये, ह्याबद्दल कोणी प्रयत्न करताना दिसत नाही व जे करत आहेत त्यांना पद्धतशीरपणे गप्प बसविण्यात येत आहे. जर व्यवस्थापकीय संचालक सनदी नोकर नसता तर त्याचे काय झाले असते ह्याची कल्पनाच करवत नाही ! हा मुद्दा येथेच सोडू, शेवटी ३० लाख रुपये कोणाच्या पित्याचे आहेत ?

पण ह्या सर्व भानगडीत आदिवासींचे काय ? असे कळते की, त्यांच्या मालाचे पैसे सहा सहा दिवस मिळत नाहीत. असे का व्हावे ? महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकाने जेथे एक माणूस पुरेल तेथे दोन लावले आहेत. मग पैसे का मिळू नयेत ? शिवाय तळाच्या आदिवासी सहकारी संस्थासुद्धा ह्या कामात भाग घेत आहेत. म्हणून जरा बारकाईने चौकशी केल्यावर असे कळले की, ह्या संस्थांनी आपले स्वतःचे अर्धा कोटी रुपये खरेदीची किंमत देण्यात गुंतविले आहेत व त्यांच्याजवळ आता पैसे नाहीत. असेही म्हणतात की, आदिवासी कल्याण मंत्र्यांच्या एका भेटीच्या वेळी सहकारी खात्यातील अधिकाऱ्याने तेथील व्यापाऱ्यांकडून पैसे उसने घेऊन वेळ मारून नेली; पण मंत्र्यांनी व्यवस्थापकीय संचालकास शाबासकी दिली व आदिवासींना मालाची किंमत वेळेवर मिळते असे जाहीर केले !! व्यवस्थापकीय संचालकांची अडचण काय ? पाच कोटी रुपयांची हमी तर आहे. मग महाराष्ट्र राज्य सहकारी बँक पैसा का देत नाही ? बँकेत कानोसा घेतला तर असे कळले की, महामंडळास कोणतीही अट न घालता पैसे हवे आहेत. म्हणजे पैसे उचलण्यापूर्वी स्टॉलचा दाखला देण्यास महामंडळ नाखूष असते. महामंडळाकडे असलेला जादा पैसा सहकारी बँकेत न ठेवता तो राष्ट्रीयीकृत बँकेत ठेवला जातो. ह्यांवर साहजिकच सहकारी बँक आक्षेप घेते. असे समजते की, ह्या व्यवस्थापकीय संचालकाने पुण्यातील एका राष्ट्रीयीकृत बँकेत दोन लाख रुपये बिनव्याजी ठेव म्हणून ठेवले आहेत. म्हणजे एवढे पैसे मुद्दाम व्यवहारात ठेवले नाहीत. का बरे ? कोणी चौकशी करील काय ? राज्य सहकारी बँक म्हणते की, आम्ही सट्टेबाजी न करता बँकिंग व्यवहार करत आहोत. ह्या सर्वांमुळे महामंडळास पैसे वेळेवर मिळत नाहीत व आदिवासी आपल्या मालाच्या पैशासाठी सहा सहा दिवस वाट पाहतो. आता रब्बी हंगाम सुरू होणार. महामंडळ पैसे वेळेवर देणार का ? वेळेवर पैसे देण्यासाठी हे तिघे सनदी नोकर काही उपाय योजत आहेत काय ? असे समजते की, हे तिघे पुन्हा व्यवस्थापकीय संचालकास पाठीशी घालण्यात गर्क आहेत.

ह्या सर्वांचा परिणाम एकच. आदिवासींच्या शोषणमुक्तीसाठी आखलेली एक कल्पक योजना तीन सनदी नोकरांच्या अकार्यक्षमतेमुळे शासनास बंद करावयाची पाळी येणार. त्याचे खापर जनता पक्षावर फोडले जाणार व त्याला त्याची किंमत आज ना उद्या मोजावीच लागणार. सनदी नोकर चांगल्या योजनांची व राजकीय पक्षांची अशीच थडगी बांधतात; पण त्यांच्या चुकांबद्दल त्यांना काहीच शिक्षा होत नाही. आहे की नाही विनोद ! जयप्रकाश नारायण उगाच नाही म्हणाले की, भारतातील सर्वांत प्रबळ ट्रेड युनियन म्हणजे इंडियन अॅडमिनिस्ट्रेटिव्ह सर्विस. हे सर्व कळत असूनसुद्धा शरदराव व त्यांचे सहकारी काय करीत आहेत !

–एक निरीक्षक


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य दहा रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

बालगंधर्वांसंबंधीच्या तीन मुलाखती माणूस (७८) दिवाळी अंकात प्रसिद्ध झाल्या होत्या. त्यातील गोहरबाईंच्या मुलाखतीची ही दुसरी बाजू.

# वस्तुस्थितीचा विपर्यास करणारी मुलाखत

वसंत शांताराम देसाई

बालगंधर्व यांच्यासंबंधीच्या तीन प्रदीर्घ मुलाखती 'माणूस' साप्ताहिकाच्या १९७८ सालच्या दिवाळी-अंकात प्रसिद्ध झाल्या आहेत. बालगंधर्व यांच्यासंबंधीचे कुतूहल अद्याप नाहीसे झाले नसल्यामुळे, त्यांच्यासंबंधीचा मजकूर शेकडो वाचक अत्यंत आवडीने वाचतात. अशा प्रकारच्या मुलाखती भावी काळात लिहिल्या जाणाऱ्या इतिहासाची साधनेही ठरू शकतात आणि म्हणूनच अशा मुलाखतीत सत्याचा विपर्यास आढळला तर त्याची वेळीच दखल घेणे आवश्यक असते. या तीन मुलाखतींपैकी गोहरबाईंच्या मुलाखतीतील त्यांच्या निवेदनात वस्तुस्थितीचा विपर्यास झालेला असून त्यामुळे काही दिवंगत कलावंतांबद्दल वाचकांचा गैरसमजही होण्याचा संभव आहे. प्रस्तुतची मुलाखत बाईंच्या मृत्यूनंतर एका तपापेक्षा अधिक काळ लोटल्यावर प्रथमच प्रसिद्ध झाली असल्यामुळे, त्यांनी केलेल्या काही ठळक विपर्यासांची त्यांच्या मृत्यूनंतर नोंद करण्याचे अप्रिय कार्य अवश्य झाले आहे.

गोहरबाईंच्या निवेदनाचा एकंदर झोक असा की, बालगंधर्वांच्या चलतीच्या काळात त्यांच्या सहवासात जी माणसे होती ती त्यांच्या पडत्या काळात त्यांना सोडून गेली. त्या वेळी बालगंधर्वांच्या शिरावर जवळजवळ अडीच लाख रुपये कर्जाचा बोजा होता. अशा त्या विपत्काळी गोहरबाई बालगंधर्वांच्या पाठीशी उभ्या राहिल्या, बाईंनी त्यांचे कर्ज फेडले आणि त्यांना नादारीतून वाचविले. खरी परिस्थिती अशी असूनही, बाई मुसलमान असल्यामुळे त्यांचे कोणी कौतुक केले नाही. इतकेच नव्हे तर अपमान आणि उपहासच पदोपदी त्यांच्या पदरात पडला!

बाईंच्या मुलाखतीमुळे एखाद्याचा असा समज होईल की, बालगंधर्वांचा पडता काळ सुरू होणे, चलतीच्या काळात त्यांच्याभोवती असणाऱ्या 'मित्र-परिजनांनी' त्यांना सोडून जाणे आणि गोहरबाईंनी गंधर्व नाटक मंडळीत प्रवेश करून बालगंधर्वांच्या संरक्षणाला सिद्ध होणे या घटना जवळजवळ लागोपाठ घडलेल्या असाव्यात. सबब, गोहरबाईंच्या विधानांविषयी विचार करण्यापूर्वी बालगंधर्वांच्या जीवनात काही बहुतांशी वादातीत घटनांचा उल्लेख करणे अवश्य आहे.

(१) बालगंधर्व, गणपतराव बोडस आणि गोविंदराव टेंबे यांनी गंधर्व मंडळीची स्थापना १९१३ साली केली. गोहरबाई सांगतात त्याप्रमाणे १९१८ साली नव्हे. (२) गोविंदराव टेंबे हे गंधर्व मंडळीच्या भागीदारीतून, व्यवसायातून आणि तिच्या रंगभूमीवरून १९१५ साली निवृत्त झाले. त्यानंतर त्यांचा आणि बालगंधर्वांचा व्यावसायिक संबंध कधीही आला नाही. (३) गणपतराव बोडस हे गंधर्व मंडळीच्या भागीदारीतून १९१९ सालअखेर निवृत्त झाले. त्यानंतर बालगंधर्वांबरोबर स्वतंत्र करार करून १९२१–१९२२ सालात काही महिने आणि १–१–१९२८ ते ३१–१२–१९३१ या कालखंडात त्यांनी गंधर्व मंडळीच्या रंगभूमीवर त्यांच्या लोकप्रिय भूमिका केल्या. (४) बिनहिशेबी कारभारामुळे बालगंधर्वांना जवळजवळ दीड लाख रुपये कर्ज झाले आहे, हे १९२१ सालच्या पूर्वार्धात उघडकीला आले. गंधर्व मंडळीच्या उत्पन्नाच्या आधारावरच ते कर्ज बालगंधर्वांनी १९२७ सालअखेर फेडले. कर्जफेडीसाठी बालगंधर्वांना या कालखंडात सावकारांना व्याजासकट एकंदर पावणेतीन लाख रुपये द्यावे लागले. या काळात गंधर्व मंडळीच्या व्यवसायावर बालगंधर्वांचे निःसीम हितचिंतक, मुंबईचे सॉलिसीटर लाड यांची देखरेख होती. सॉलिसीटर लाड म्हणजेच दुर्गाबाई खोटे यांचे वडील. १९२७ सालानंतर गंधर्व नाटक मंडळीच्या व्यवसायाशी लाडसाहेबांचा कधीही संबंध आला नाही. (५) १९२१ सालापूर्वीचा काळ हा बालगंधर्वांचा पडता काळ नसून ऐन उत्कर्षाचा काळ होता. (६) १९२७ सालअखेर जे कर्ज फिटले ते बालगंधर्वांचे पहिले कर्ज म्हणता येईल. (७) १९३१ सालअखेरपर्यंत गंधर्व मंडळीच्या उत्पन्नाची ओहोटी सुरू झालेली नव्हती. जुलै १९१३ पासून १९१९ सालअखेरपर्यंत तिला एकंदर चार लक्ष सदतीस हजार उत्पन्न झाले, तर १९२० ते मे १९३१ पर्यंत एकंदर एकोणीस लक्ष शहात्तर हजार रुपये–म्हणजे वर्षाकाठी सुमारे एक लक्ष सत्तर हजार रुपये उत्पन्न झाले. (पहा 'रत्नाकर', गंधर्व-अंक) (८) बोलपटांच्या आगमनामुळे आणि इतर कारणांमुळे गंधर्वमंडळीच्या उत्पन्नाची ओहोटी १९३२ सालात सुरू झाली. १९३० सालानंतरच्या कारभारामुळे आणि १९३२ सालापासूनच्या उत्पन्नाच्या ओहोटीमुळे १९३३ सालअखेर बालगंधर्वांच्या कर्जाचा आकडा जवळजवळ सत्तर हजार रुपयांपर्यंत जाऊन थडकला! (९) नाट्यव्यवसायाच्या उत्पन्नातून कर्जफेड शक्य नाही, असे आढळून आल्यामुळे बालगंधर्वांनी १९३४ सालअखेर गंधर्व मंडळी बंद केली आणि १९३५ च्या जानेवारी महिन्यात प्रभात फिल्म कंपनीत प्रवेश केला. बालगंधर्व आणि प्रभात यांच्या भागीदारीने 'बालगंधर्व-प्रभात' असे नाव धारण केले. (१०) १९३४ सालअखेर गंधर्व-मंडळी कायमची बंद झाली, असाच सर्वांचा समज होता; परंतु गंगाधरपंत लोंढे यांनी पुढाकार घेऊन १९३५ साली गंधर्व मंडळीची पुनर्घटना करून बालगंधर्वांशिवाय गंधर्व मंडळीचे प्रयोग सुरू केले. (११) बालगंधर्वांना बोलपटांचा व्यवसाय न मानवल्यामुळे पुनर्घटित गंधर्व मंडळीत भूमिका करण्यास त्यांनी १९३६ सालच्या उत्तरार्धात पुन्हा सुरुवात केली; परंतु कंपनीचा खर्च भागविता येईल इतके

उत्पन्न न झाल्यामुळे आणि कुटुंबवत्सल नटांचे पगार थकल्यामुळे, गंगाधरपंत लोंढे वगैरे नट १९३७ सालच्या अखेरीस गंधर्व मंडळीतून बाहेर पडले. (१२) बालगंधर्व आणि गोहरबाई यांची पहिली भेट मुंबई येथे ३०–१२–१९३७ रोजी झाली. (१३) १९३८ सालच्या मार्च किंवा एप्रिल महिन्यात गोहरबाईंनी गंधर्व मंडळीत प्रवेश केला. त्यांच्या मुलाखतीतील निवेदनाप्रमाणे १९२८ साली नव्हे ! या गोड आवाजाच्या गायिकेने नाटकात भूमिका केल्या तर नाटकांचे उत्पन्न वाढू शकेल, अशी बालगंधर्वांची कल्पना होती.

'गंधर्व मंडळी १९१८ साली सुरू झाली, मी १९२८ साली गंधर्व-मंडळीत प्रवेश केला, 'स्वयंवर' नाटकातील 'अति आनंद फुलवि कलिका' हे पद मी म्हणत असे (मुलाखत पृष्ठ ४७, स्तंभ १ व २)–' यांपैकी बाईंचे एकही विधान खरे नाही. गंधर्व मंडळीच्या आणि बाल-गंधर्वांच्या पडत्या काळात त्यांना सावरण्यासाठी धावून आलेल्या एका नामवंत गायिकेची बोळवण बालगंधर्वांनी 'अति आनंद फुलवि' या पदावर करावी, ही कल्पनाच हास्यास्पद आहे. गोहरबाई १९२८ साली गंधर्व मंडळीत राहिल्या नसून १९३८ साली राहिल्या. त्या वेळी 'अति आनंद' हे पद म्हणायचे त्यांचे वयही नव्हते. एका चुणचुणीत मुलीने (बाईने नव्हे !) म्हणायचे ते पद असून विष्णु घाग या नावाचा एक मुलगा वर्षानुवर्ष, १९२१ सालापासून १९३१ सालापर्यंत ते म्हणत होता.

'पडत्या काळात मी कंपनीला सावरले हे काही कमी कर्तृत्व नाही,' असे सांगून, पडत्या काळात बालगंधर्वांना सोडून गेलेल्या माणसांची जी यादी (५१।१ आणि ५१।१) बाईंनी दिली आहे


आणीबाणीच्या पावणेदोन वर्षांचा
वेगळा शोध

प्रभावी, परखड आणि प्रामाणिक

# जनांचा प्रवाहो चालिला

लेखक : विनय हर्डीकर

किंमत : वीस रुपये

राजहंस प्रकाशन,
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.


त्यात गोविंदराव टेंबे, गणपतराव बोडस, मास्तर कृष्णराव, सदूभाऊ रानडे आणि पटवर्धनबुवा या नामवंत नटांचा समावेश केलेला आहे. १९३१ सालअखेरपर्यंत बालगंधर्वांच्या पडत्या काळाची सुरुवातच झालेली नव्हती. व्यावसायिक बेबनावामुळे गोविंदराव टेंबे यांनी १९१५ साली गंधर्व मंडळी सोडली तो बालगंधर्वांचा पडता काळ नसून ऐन उत्कर्षाचा काळ होता. गणपतराव बोडस १९१९ साली भागीदारीतून निवृत्त झाले तोसुद्धा बालगंधर्वांच्या उत्कर्षाचाच काळ होता. त्या काळात 'स्वयंवर' नाटकासारखे हुकमी एक्के गंधर्व मंडळीच्या हातात होते आणि 'एकच प्याला' नाटकासारखे एक नवे जबरदस्त नाटक १९१९ सालच्या पूर्वार्धातच रंगभूमीवर आले होते. १९२८ ते १९३१ या काळात गणपतराव स्वतंत्र करार करून गंधर्व मंडळीत राहिले. तो करार १९३१ अखेर बालगंधर्वांनीच संपुष्टात आणला, गणपतरावांनी नव्हे ! विनायकराव पटवर्धनांचे गुरू, विष्णु दिगंबर पलुसकर १९३१ साली निवर्तल्यामुळे त्यांची परंपरा चालविण्याच्या महत्त्वाकांक्षेने विनायकराव नाट्यव्यवसायातूनच निवृत्त झाले. त्या-नंतर जवळजवळ तेरा वर्षे त्यांनी रंगभूमीवर भूमिका केल्याच नाहीत. १९३४ सालअखेर बालगंधर्वांनी गंधर्व मंडळी बंद केल्यामुळे स्वतःच्या चरितार्थासाठी सदूभाऊ रानडे यांना पुण्यात कापडाचे दुकान थाटावे लागले. गंधर्व मंडळी बंद झाल्यामुळे आणि बाल-गंधर्वांच्याच आग्रहामुळे मास्तर कृष्णरावांनी प्रभात फिल्म कंपनीत संगीत दिग्दर्शक म्हणून १९३५ साली नोकरी पत्करली. सबब, बालगंधर्वांचा पडता काळ सुरू झाला म्हणून या कलावंतांनी गंधर्व मंडळी सोडली किंवा ते बालगंधर्वांना सोडून गेले, हे गोहरबाईंचे विधान सर्वस्वी विपर्यस्त असून या थोर कलावंतांवर अन्याय कर-णारे आहे !

यापेक्षा अधिक मोठा अन्याय बाईंनी पुण्याचे कै. डॉक्टर रंगनाथ हरी सोमण यांच्यावर केला आहे. बालगंधर्व पुण्यात असले म्हणजे त्यांची सर्वतोपरी देखभाल करणारे जे निवडक आणि निष्ठावंत स्नेही होते त्यात डॉ. सोमण अग्रगण्य होते. सोमण आणि बालगंधर्व यांचे धनको आणि ऋणको असे संबंध कधीच नव्हते; परंतु, बाल-गंधर्वांचे इतर स्नेही कसे वागले ते दर्शविण्यासाठी, 'डॉ. सोमण यांनी बालगंधर्वांच्या सामानावर टाच आणली' असे (५७।१) विधान बाईंनी केले आहे ते संपूर्ण असत्य आहे ! बालगंधर्वांच्या दिवंगत पत्नीचा उल्लेख तर बाई 'घुबड' या शब्दाने (५९।१) करतात !

'गंधर्व मंडळीच्या रंगभूमीवर भूमिका करून मी बालगंधर्वांचे कर्ज फेडले' असे एक विधान गोहरबाईंनी केले आहे. गंधर्व-मंडळीच्या रंगभूमीवर त्या १९३८ सालच्या एप्रिल–मे महिन्यापासून भूमिका करू लागल्या; पण आपण गंधर्व मंडळीत १९२८ साली राहिलो असे सांगून, 'आपल्या हातून कामे होत नाहीत अशी खात्री पटल्यानंतरच बालगंधर्वांनी मला पुढे केले,' (५०।१) अशी तक्रार त्या करतात ! आपल्या 'ऐन बहराची' दहा वर्षे (१९२८-१९३८) बालगंधर्वांमुळे फुकट गेली, असे बाईंनी सुचविल्यामुळे, बालगंधर्वांच्या वृत्तीवर 'पुरुषी अहंकार' असा शेरा या मुलाखतीत मारण्यात आला आहे ! रंगभूमीवरील आपल्या अपयशाला सहानु-

भूती मिळविण्यासाठी बाईंनी हा विपर्यास केला असावा. वस्तुस्थिती अशी की, गोहरबाई गंधर्व मंडळीत १९३८ सालच्या मार्च किंवा एप्रिल महिन्यात राहिल्या आणि त्यानंतर दोन किंवा तीन महिन्यांतच त्या 'मृच्छकटिका'तील वसंतसेना आणि 'संशयकल्लोळा'तील रेवती या भूमिका करू लागल्या. त्या वेळी गंधर्व मंडळीचा मुक्काम नाशिक येथे होता. 'मानापमाना'तील भामिनीच्या भूमिकेच्याही तालमी सुरू झाल्या. या तीनही नाटकांतील नायकांच्या भूमिका बालगंधर्व करू लागले. आपल्याला लाभलेल्या या रत्नाची किंमत मुंबईतच होईल अशा कल्पनेने बालगंधर्वांनी १९३८ च्या नोव्हेंबर महिन्यात या तीनही नाटकांचे प्रयोग मुंबईत केले; पण बाईंच्या स्त्री-भूमिका किंवा बालगंधर्वांच्या पुरुष-भूमिका प्रेक्षकांना पसंत न पडल्यामुळे ही तीनही नाटके मुंबईत किंवा मुंबईबाहेरही चालली नाहीत. त्यामुळे पुन्हा द्रौपदी, रुक्मिणी आणि सिंधु या आपल्या अविस्मरणीय भूमिकांवरच बालगंधर्वांना भर द्यावा लागला. गंधर्व नाटक मंडळीचे कर्ज फेडायला निघालेल्या गोहरबाईंची गंधर्व मंडळीच्या रंगभूमीवरील कारकीर्द १९३८ सालीच जवळजवळ संपुष्टात आली !

'आपल्या हातून कामे होत नाहीत असे पटल्यानंतरच बालगंधर्वांनी मला पुढे केले', असे बाई म्हणतात. बाईंना १९३८ साली पुढे करण्यात आले असल्यामुळे, स्वतःच्या निरुपयोगीपणाची खात्री बालगंधर्वांनी १९३८ सालीच पटली असावी ! वस्तुस्थिती मात्र अशी की, त्यानंतर सहा वर्षांनी (१९४४) मुंबईच्या पहिल्या नाट्यशताब्दिमहोत्सवात झालेल्या 'स्वयंवर' आणि 'एकच प्याला' या नाटकांत बालगंधर्वांनी अनुक्रमे रुक्मिणी आणि सिंधू या भूमिका केल्या आणि त्या पहाटे तीन तीन वाजेपर्यंत हजारो प्रेक्षकांनी अत्यंत गोडीने आणि आदराने पाहिल्या. गोहर-नारायणाच्या भूमिका असलेला एकही प्रयोग त्या महोत्सवात झाला नाही आणि व्हावा असा आग्रहही बालगंधर्वांनी धरला नाही !

आपल्या आवडत्या आणि लोकप्रिय भूमिकांशी तद्रूप होऊन आपण त्या कराव्या आणि प्रेक्षकांनी आपल्या गायनाभिनयाशी तद्रूप व्हावे, हा बालगंधर्वांच्या जीवनातला फार मोठा आणि शेवटी शेवटी तर एकुलता एक आनंद होता. त्या आनंदाच्या 'आहारी' गेल्यामुळे, 'आपल्या हातून आता भूमिका होत नसल्यामुळे कोणाला तरी पुढे करावे,' असे त्यांना कधीच वाटले नाही. १९५२ सालापासून त्यांचा पाय अधू झाल्यामुळे बालगंधर्वांना रंगभूमीवरील हालचाली करणे जवळजवळ अशक्य झाले; पण त्या वेळीसुद्धा आपल्या शजारी एखादी सखी किंवा दासी उभी करून (भूमिका– बापूराव माने) ते सिंधु आणि रुक्मिणी या भूमिका करीतच राहिले. १९५४ सालच्या जून महिन्यात पुण्याच्या हिंद विजय नाटकगृहात केलेल्या 'स्वयंवर' आणि 'एकच प्याला' या नाटकांच्या प्रयोगांच्या वेळी त्यांनी तीच तऱ्हा केलेली पाहून प्रेक्षक अक्षरशः सद्गदित झाले ! बालगंधर्वांनी पुण्याच्या रंगभूमीवर केलेली ती शेवटची नाटके होती. 'स्वयंवर' नाटकातील रुक्मिणीची भूमिका शेवटी २२–५–१९५५ रोजी आणि 'एकच प्याला' नाटकातील सिंधूची भूमिका ४–६–५५ रोजी करून बालगंधर्वांनी रंगभूमीवरील त्यांच्या असामान्य कारकीर्दीवर शेवटचा पडदा टाकला ! बालगंधर्व कधी आजारी असले किंवा त्यांचा आवाज बसला असला तर, केवळ बाईंचा हट्ट पुरविण्यासाठी, 'स्वयंवर' नाटकाच्या एखाद्या प्रयोगात रुक्मिणीची भूमिका करण्याची परवानगी त्यांनी बाईंना दिली असेल, कदाचित ! पण 'आपल्या हातून कामे होत नाहीत म्हणून कोणाला पुढे करण्याचा' प्रश्न बालगंधर्वांच्या कारकीर्दीच्या अखेरीपर्यंत कधी उद्भवलाच नाही !

गंधर्व मंडळीच्या रंगभूमीवर बाईंनी केलेल्या भूमिकांचा असा बोजवारा उडाल्यानंतर, 'बालगंधर्वांचे अडीच लाखांचे कर्ज मी फेडले व नादारीचा डाग त्यांना लागू दिला नाही,' अशी वल्गना (५१/२) बाईंनी केली म्हणजे त्यांच्या अमर्याद धाडसाचे कौतुक वाटू लागते. बालगंधर्वांचे दुसरे कर्ज अडीच लाखांचे तर नव्हतेच; पण जे होते तेसुद्धा फिटणे अशक्य झाल्यामुळे त्यांना अखेर नादारी पत्करावी लागली, हे एक दुर्दैवी सत्य आहे ! पावणेतीन लाख रुपयांचे पहिले कर्ज फेडणाऱ्या बहाद्दराच्या जीवनाची ती शोकांतिकाच समजली पाहिजे !

साक्या आणि दिंड्या धरून 'शापसंभ्रम' नाटकात एकंदर १७० गीते असताना ८०० पदे आहेत (५४/१), दुर्गाबाई खोटे म्हणजेच पूर्वाश्रमीच्या विठाबाई लाड असताना दुर्गाबाई या विठाबाईंच्या कन्या (४९/१) आणि जेथे देवदूत घाबरतील अशा प्रदेशात प्रवेश करून, 'टिळकपक्षीय खाडिलकरांना गांधीजींचे चरख्याचे राजकारण थोडेच आवडणार होते?' (५३/१) अशी बेछूट विधाने बाई करू लागल्या म्हणजे मौज वाटते. त्यात भर म्हणूनच की काय, 'मुंबईचे गव्हर्नर लेस्ली विल्सन म्हणजेच विल्सन कॉलेजचे विल्सन' असा विनोद खुद्द 'दादूमियांनी' केला आहे, तो या स्वैर मुलाखतीला शोभेसाच समजला पाहिजे ! □


## प्रसिद्ध झाले

# टॉलस्टॉय – एक माणूस

### लेखिका : सौ. सुमति देवस्थळे

आवृत्ती दुसरी । मूल्य पंचावन्न रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

कथा

# किसलिये मैंने प्यार किया ?

**सौ. मीना लवाटे**

'मम्मी, डॅडी आये, डॅडी आये ' अगदी रेडिओ-वर लागणाऱ्या बातम्यांच्या स्टाइलवर अमित ओरडला. हातात विणायला घेतलेला स्वेटर दोन उलट, तीन सुलट टाके घालून मी पूर्ण केला आणि खाली ठेवला. आता उठायलाच हवं होतं. डिंग–डाँग बेल वाजली की हसतमुखानं दार उघडायला हवं होतं. मग काही तरी खायला, चहा सगळं अगदी ओघानेच आलं. पावसाच्या थेंबासारखं एका-मागून एक. थांबून चालणार नव्हतंच. सतत बरसायला पाहिजे होतंच.

दार उघडलं तो स्वारी दारातच उभी होती. किंचित रागही आलेला दिसत होता.

'किती वेळा बेल वाजवायची ? काय करत होतीस ?'

'अं कुठं काय ? लगेच तर दार उघडलं.'

'नाही, डॅडी नाही. अहो, हिनं वूल खाली ठेवली आणि पाच मिनिटं स्तब्धच उभी होती !' अगदी नेहमीच्या सवयीप्रमाणे अमितनं माहिती पुरवली.

लहान मुलं बुमरँगसारखी असतात. 'नेहमी खरं बोलावं अमित बेटा,' असं लहानपणापासूनच माझी त्याला शिकवण होती. अमितसारखा गोजिरवाणा मुलगा, विश्वाससारखा उमदा चार आकडी पगार-दार पती, कसा अगदी जाहिरातीत शोभेल असा संसार होता माझा!

पण आज–काल काय झालं होतं कोणास ठाऊक, माझं कशातच लक्ष लागत नव्हतं. अमितही आता आठ वर्षांचा झाला होता. आम्हाला नंतर मूल नको होतं. पहिलीच मुलाची लॉटरी फुटली होती. त्यामुळे No chance. आयुष्य अगदी यंत्रवत झालं होतं. सकाळी उठणं, चहा करणं, स्वयंपाक करणं, जेवणं, झोपणं, परत संध्याकाळी उठणे, जेवणं, झोपणं. खलास ! आयुष्याचा एक दिवस पदरात पडला. एक चहा करता करता किती विचार मनात येऊन गेले. चहा गाळतो तसे हे विचार गाळून टाकता येत असते तर किती बरं झालं असतं, नाही ?

विश्वासला चहा दिला. शेजारी कोथिंबीर, खोबरं घातलेली, जोडीला लिंबाची फोडही असलेली उपीटाची डिश ठेवली. अमितला डायनिंग टेबलावर बोर्नव्हिटा ठेवला आणि मी विश्वाससमोर चहा प्यायला कप घेऊन बसले.

खरंच किती छान दिसत होता विश्वास! पांढरा झब्बा आणि पांढरा पायजमा. कुरळे केस, धारदार नाक, पिंगट चॉकलेटी रंगाचे डोळे, सावळा रंग आणि भव्य कपाळ. मक्याच्या कणसासारख्या भरगच्च दंतपक्ती. एकदम इंप्रेसिव्ह होता विश्वास. उगीच का मी इतक्या मुलांना ठोकरून ह्याच्या गळ्यात माळ घातली होती !

'चल वैशाली, झटपट आवर. आपण आज कुठे तरी, लांब फिरायला जाऊ या. शरीर कसं आंबून गेलंय !' असं म्हणून त्याने हात वर करून आळस दिला; पण 'वैशू डिअर, एकदम quick हं !'

'Lovely ! मार्व्हेलस ! असं वाटतं की, तुला अगदी पेढ्यासारखी उचलून खाऊन टाकावी !'

'विश्वास पुरे हं. सगळा मेकअप् बिघडून जाईल, चला लवकर, यायला, उशीर होईल. अमित सातपर्यंत खेळून परत येईल.'

संध्याकाळच्या संधिप्रकाशात घातलेला प्रत्येक कपडा उजळून निघाला होता. अंगावर फोकस मारावा तसा प्रत्येकाचा चेहरा दिसत होता. दोन डोंगरांच्यामध्ये सूर्य क्षितिजाशी भिडला होता. वसुंधरा साश्रुनयनांनी त्याचा निरोप घेत होती, असं वाटत होतं. तर एकदा वाटलं, चंद्राचं आगमन होणार म्हणून हे आनंदाश्रू तर नव्हेत ?

'वैशाली, अग कसला विचार करतेस ? मगापासून बघतो आहे, आपली गप्प गप्प चालली आहेस. हल्ली बऱ्याच वेळा तुझी भावसमाधी लागलेली असते. तुला काही होत तर नाही ना ? नाही तर एकदा डॉक्टरकडे जाऊन येऊ या. का सांगत नाहीस तू मला?' विश्वासचा मधभरा आवाज. किती प्रेम होतं विश्वासचं माझ्यावर ! इतकं सगळं असून ही सुख दुखतच होतं.

तोच समोरून आवाज आला, 'हॅलो, विश्वास !' मी चमकून वर पाहिलं तर समोर कुंदन उभा होता. परवा-परवाच हा आमच्या समोरच्या ब्लॉकमध्ये राहायला आला होता. B. E इंजिनियर होता. स्वभाव अगदी मन-मोकळा. हसायला लागला की, एखादा धबधबा कोसळावा तसा खळखळाटी हसे. बोलणं–चालणं एकदम पॉलिश्ड !

'हाय भाभी ! How beautiful ! 'विश्वास, नशीबवान आहेस बेटचा ! येतोच उद्या चहा प्यायला !' असं म्हणून हात हलवत हलवत निघून गेला.

दुसऱ्या दिवशीच विश्वास ऑफिसात जायच्या अगोदर स्वारी दारात दत्त म्हणून हजर झाली. चहा करणं ओघानंच आलं. मी गप्पच होते; 'काय विश्वास, आज सकाळीच भांडण झालेलं दिसतंय !'

'नाही हं उगीच काय काही तरी बोलता ?' मी.

'अरे बघ, मात्रा कशी लागू पडली की नाही ? लगेच बोलणं सुरू. आमचं असंच आहे. पेशानं यंत्रसामुग्रीशी झगडत असलो तरी कुठली औषधं कुठं लागू पडतात आणि ती कोणत्या व्याधीवर आणि केव्हा द्यायची हे मला अगदी परफेक्ट समजतं बघ !' असंच आणि ह्या प्रकारचं स्वारी आली की अखंड बोलत बसायची.

कुंदन आमच्या घराशी एकरूप कधी झाला ते समजलंच नाही. आई–वडील परगावी. सडाफटिंग माणूस. त्यामुळं मागं कटकट नाही. वारंवार जेवणाच्या फेरी झडू लागल्या. कधी तो आम्हाला बाहेर जेवायला नेई, कधी स्वतःच आमच्या घरी येई.

एक दिवस विश्वास म्हणालासुद्धा–'राणी-सरकार, आपण कुंदनमुळं का होईना, परत माणसात आलात. कुठचा कोण, परजातीचा

माणूस; पण बेटा अगदी जॉली आहे नाही ? कुणाला कसं खुलवावं ते बरोबर समजतं !'

त्याचे कपडे, त्याचं रहाणं ह्या सगळ्याकडे माझंसुद्धा कळत-नकळत, बारकाईनं लक्ष जाऊ लागलं. त्याने नेव्ही ब्लू शर्ट घातला की सहजच माझा हात विन्नी जॉर्जेट नेव्ही ब्लूकडे जाऊ लागला. त्याला डार्क रंगाचे कपडे वापरायची फारच सवय होती. तो कधी येतो, कधी जातो, कसा दिसतो, कुठं उभा आहे, अगदी बारीक–सारीक गोष्टींकडे नजर जाऊ लागली. त्यालासुद्धा समजत होतं की काय कोणास ठाऊक ! मी गॅलरीत गेले की हा आपला समोरच उभा असे. हा समोर दिसताच काय होत असे कोण जाणे; पण मी झटकन् आत येत असे. वास्तविक मला तिथेच उभं रहायचं असे. तो चहा प्यायला आला की चहा नेताना हाताला कंप सुटायचा. कानशिलं गरम व्हायची. हा अनुभव नवा होता. असं व्हायला नको होतं. मी लग्न झालेली, एका मुलाची आई असलेली स्त्री होते. संसारात कुठेच कमतरता नव्हती. मला तसा अधिकारही नव्हता; पण 'प्यार किया नही जाता, हो जाता है' असंच काहीसं घड लागलं. ध्यानी–मनी–स्वप्नी कुंदन दिसू लागला. मी दिवसेंदिवस अधिकच अंतर्मुख झाले. द्रौपदीची अवस्था अशीच झाली असेल का ? पुरुषार्थाच्या सर्व कसोटींना उतरलेले पाच पती असूनही सहाव्या कर्णावर तिची का बरं प्रीती जडावी ? बायकांचं मन सुप्त ज्वालामुखीसारखं असावं. कुठं तरी आतल्या आत ते धुमसत असावं आणि योग्य संधी मिळताच ते उफाळून येत असावं.

विश्वासच्या लक्षात ही गोष्ट आली. एक दिवस रात्री मला जवळ घेत विश्वास म्हणाला, 'वैशु, तू थोडे दिवस कुठे तरी जा. तुला कंटाळा आला असेल. अग नवरा कितीही प्रिय असला तरी रोजच्या रूटिनला माणूस कंटाळतो. आजच मी बाबासाहेबांना फोन केलाय, की वैशाली थोडे दिवस मुंबईला येते आहे.'

किती जपत होता विश्वास मला ! मी त्याची सर्वस्व होते. विश्वास एकुलता एक होता. आई-वडील निवर्तल्याला दोन वर्षं झाली होती. मी म्हणजे त्याचा एकमेव आधार होते. त्याच्या मायेच्या दोन शब्दांनी मला रडायला यायला लागलं. स्त्रीचं जीवन पती ह्या एका केंद्रबिंदूभोवती वर्तुळासारखं फिरत असतं. तो परिघ थोडा चुकला तर वर्तुळ वाकडं होतं, नाही तर अपुरं राहातं. मला हे दोन्ही नको होतं; पण काय करू ? माझं मन सैरभैर झालं होतं. उद्या–परवाच आपण जावं, म्हणजे खरंच ह्या सगळ्याचा विसर पडेल.

'अमितसुद्धा राहू दे. वैशू, तू एकटीच जा ! जरा मैत्रिणी भेटतील. जुन्या आठवणींना उजाळा येईल !'

सकाळच्या एस. टी. ने मी निघाले. बाहेर पडता पडता परत लक्ष समोर गेलं. किती चुकार होतं माझं मन ! पावसाळ्यात उगवणाऱ्या तृणांकुरांसारखं होतं. कितीही खुडलं तरी परत उगवणारच. कुंदनचं दार बंद होतं.

एस. टी सुरू झाली आणि खडकी मागे पडली; पण मनाला पडलेली खिडकी बुजेना. त्या खिडकीतून परत परत कोणी तरी डोकावू लागलं. गाडीच्या कर्णकर्कश्श ब्रेकनं मी दचकून जागी झाले. राजमाची पॉइंटनंतरच्या वळणावर गाडी उभी होती.

'अरे, पडला रे पडला! भलतंच लागलेलं दिसतंय !'

'काय साली हल्लीची पोरं घाटातूनसुद्धा सुसाट गाडी मारतात !" एक म्हातारा आवाज.

'बरं झालं बाई, ड्रायव्हरनं ब्रेक लावला. नाही तर काय झालं असतं ग बाई !' एक प्रौढा.

काय झालं म्हणून बघण्यासाठी मी खिडकी उघडली आणि समोरचं दृश्य बघून 'आई ग !' असा उद्गार माझ्या तोंडातून बाहेर पडला. माझ्यासमोर कुंदन रस्त्यावर उताणा पडला होता. बाजूला आणिक एक तरुण होता. तोच सावळा रंग, तीच भरदार शरीरयष्टी. वेदनेने मुडपलेले ओठ, कपाळावर रक्त वाहात होतं. काय घडलं कुणास ठाऊक, पण मी सुटकेस घेऊन उभी राहिले. सगळी माणसं माझ्याकडे बघू लागली. एकमेकांत कुजबुजू लागली. एक धिटाईने म्हणाला, 'आपल्या ओळखीचेत का ? का रिलेटिव्ह आहेत ?'

मी काहीही न बोलता खाली उतरले. कुंदनच्या कपाळावरचं रक्त पुसलं. तोच मागून गाडी येताना दिसली. मी हात केला. 'प्लीज, प्लीज ह्यांना दवाखान्यात न्या हो ! पंचनाम्याची वाट पाहू नका. तेवढा अवधी नाही !' मी इतकी हळवी झाले की तो माणूस पार विरघळून गेला किंवा स्त्री दाक्षिण्य म्हणून म्हणा, पण त्याने दोघांना गाडीत घातलं. मी पण गाडीत बसून दवाखान्यात गेले.

भराभरा नर्सेसनी धावपळ केली. डॉक्टरांना फोन लावला. डॉक्टर आले. दोघांनाही तपासलं आणि ऑपरेशनचा निर्णय घेतला.

सात तास तोंडात पाणी न घेता मी बसून होते. कुंदनला ब्लड दिलं जात होतं. प्रत्येक रक्ताच्या थेंबागणिक काळजीनं माझं रक्त आटत होतं. कुंदन माझा कोणीच नव्हता. कोण होते मी कुंदनची ? प्रेयसी ? नाही, मुळीच नाही ! मग काय नातं होतं त्याचं–माझं ?

'आपण मिसेस कुंदन का ?' नर्स विचारीत होती. 'आपले मिस्टर शुद्धीवर आले आहेत, आपल्याला बोलावताहेत.' मी काय दचकले. 'माझं नाव घेताहेत ?' माझ्या ह्या प्रश्नाने नर्स माझ्याकडे बघतच राहिली.

'आपलं नाव ? पण बहुधा आपल्यालाच बोलावत असावेत.'

जावं का आत ? बघावं का त्याला ? पण नको. ह्याचा फार विपर्यास होईल. विश्वासच्या आणि माझ्या संसाराला चूड लागेल. मला गेलं पाहिजे. चंद्राला निरोप देताना अश्रू आले तरी सूर्याच्या उजेडाची नितांत गरज आहे. त्याला आनंदानं सामोरं गेलं पाहिजे. त्याचे आनंदाश्रू झाले पाहिजेत; पण मग हे सारं मी कशासाठी केलं ? मी झटकन बॅग उचलली आणि बाहेर पडले. नर्सने मारलेली हाक ऐकू आली. पाठोपाठ लताचे गाण्याचे स्वर – किसलिये मैंने प्यार किया ?

कथा

# वैर

पद्माकर रा. पाटील

त्याला अजूनही वाटत असतं की, गल्लीतनं पुन्हा एखादी चक्कर टाकून पहावी. वास्तविक अशा ह्या लांबट गल्लीतून त्याला सहसा खाली हात बाहेर पडावं लागत नसे. बरं, सूर्यही माथ्यावर आलाय. त्यामुळे लोकांची जेवणं आटोपली नसावी असंही नाही.

त्याला भूक आवरली जात नव्हती. नुसतीच तोंडातली लाळ तो हवी तेव्हा पोटात ढकलीत होता. तेवढचं त्याला बरं वाटे. बरंचसं फिरणं झाल्यामुळे तो थकला अन् फाटकी चड्डी वर सारीत गल्लीच्या कोपऱ्यावरल्या बस स्टॉपच्या शेडमध्ये शिरला. एक-दोन जणं सोडले तर बस स्टॉप तसा सुनाच होता.

हातातलं जर्मलचं ठेचाळलं भाडं त्यानं फळीवर ठेवलं. खांद्यात अडकवलेली मळकट थैली काढून ठेवली अन् वरच्या उभ्या ठोकल्या फळीवर ढुंगण टेकून बसला. इकडे-तिकडे पहात त्याने अंगातल्या फाटक्या शर्टचा खालचा मोकळा भाग धरला अन् खरडून घामेजलं तोंड पुसून काढलं. तशी गालावरची जखम स्पर्शानं दुखावली. वेदनांनी तो विव्हळला. विव्हळतच त्याने बापाला चार-पाच इरसाल शिव्या हासडल्या.

गेल्या पंधरवाड्यापासनंच बापानं त्याला ही देणगी दिली होती. दहा-अकरा वर्षांचा असल्यामुळे तो कोवळा-देखणा दिसायचा. त्यामुळे भिकाऱ्याच्या धंद्याच्या दृष्टीने हे रूपडं घातक होतं, हे जन्मजात भिकारी असलेल्या बापाला न कळण्याइतका तो मूर्ख नव्हता. अन् एके रात्री तो झोपला असताना बापानं तापलेला लालजर्द सरोटा त्याच्या गोबऱ्या गालावर क्षणभर निर्दयपणे दाबून ठेवला. मरणप्राय यातनांनी तो रात्रभर ओरडत राहिला. भीक मागत हिंडणारी मायही नुस्ती त्याला गोंजारीत राहिली. उगं करीत राहिली. तळल्या पुरीसारखा टरटरून लदबदलेला, फुगलेला त्याचा गाल पाहून बाप मात्र मनोमन खूष झाला अन् जेव्हा दुसऱ्या दिवशी पोऱ्याने आदल्या दिवसापेक्षा अधिक भाकर-तुकडे अन् बरीचशी नाणीही गोळा केलेली त्याने पाहिली तेव्हा तर त्याला अत्यानंदच झाला होता. मग त्याने आपण धंद्यात किती कर्तबगार आहोत ह्याचीही मोहल्ल्यात प्रौढी मारायला कमी केलें नाही.

जखमेचा दुखरा भाग त्याने क्षणभर अल्लाद दाबून धरला. मुकाट रस्त्यावरची विरळ रहदारी पाणवटल्या डोळ्यानं पहात राहिला. निथळत्या उन्हातनं त्याची नजर समोरच्या गल्लीतल्या घरांचा कानोसाही घेतच होती.

तीन-एक जण स्टॉपवर बससाठी रेंगाळत होते. त्याने फळीवरनं उतरून फाटक्या पॅन्टीत झाकलेलं ढुंगण झटकलं अन् फळ्यांच्या रांगेतनं चालत तो शेडबाहेर आला. एरवी तो अशा रिकाम्या शेडमध्ये फळ्यांवर बॅलन्सिग करीत फिल्मी गाणी गायचा. माकडासारखा आडवा-तिडवा लोंबकळत रहायचा.

'साब, धा पैसे द्यानं जी. गैरी भूक लागली.' त्यानं फाटकी चड्डी वर सावरली. करधोड्यात अडकविली. बाहीला शेंबळट नाक घासलं.

'अबे हट्! फुट यहाँसे! भीक मँगता है रिकामचोट!'

'तेरा बाप क्या करता बे?'

'उसकी माँ के साथ सोता है सिर्फ!'

तिघंही फसकन् खळखळून हसलेत. तशी बस आली अन् हसीमजाक करीत तिघंही लगबगीने वर चढलेत. क्षणभर बसने थरथरत थांबून स्टॉप सोडला.

तो नुसताच आशाळभूत पळणाऱ्या बसकडे पहात राहिला अन् मग पचकन् थुंकला.

समोरच्या टेलिफोनच्या तारेवरला मघाचा कावळा उगाच नाचायला लागला होता. तसं त्याला हसू फुटलं.

तो पुन्हा शेडमध्ये आला. फाटकी मळकट थैली त्यानं डाव्या खांद्यात अडकवली अन् जर्मलचं ठेजाळलं भाडं हातात घेतलं. घामानं त्याचं अंग लिबलिबलं. खाज सुटली.

कोपऱ्यावरच्या कॉर्पोरेशनच्या नळावर तो अधाश्यासारखा धडपडला. सर्रसर्र त्याने पूर्ण तोटी घुमवली, पण ओंजळीत यावं अशी धार नव्हती. मग त्यानं तोंड उताणं करून तोटीच तोंडात धरून ठेवली. बराच वेळ. पाण्यानं पोट भरल्यासारखं वाटलं तशी त्यानं तोंडातली तोटी सोडली; पण अन्नाची जागा पाणी कुठवर भरून काढणार?

त्यानं खांद्यानं तोंड पुसलं, तसं समोरच्या गल्लीतल्या पिवळ्या घराच्या ओटीवर कुणी बाई उभी आहेसं त्याला दिसलं. ती कुणा भिकाऱ्याची वाट पहात आहेसं त्यानं ताडलं अन् लगबगीने थैली सावरीत 'बाशी-कुशी वाढा वऽऽमायऽऽ' असं ओरडत गल्लीत शिरला.

पिवळं घर ओलांडल्यावर त्याला जाणवलं की, ती बाई काहीतरी विणीत ओटीवर शतपावली करीत आहे. तिचं पोट वाजवीपेक्षा जास्तच मोठ्ठं आहे. तो हिरमुसला. निराशला.

त्याला वाटलं, आज काही आपल्याला खायलासुद्धा तुकडा मिळत नाही. अन् भाकर-तुकडा नसला म्हणजे बाप हाणणार! खरं म्हणजे घरात अर्धा पोतं भरून भाकर-तुकडे पडून आहेत. हे तुकडे बाप कोठेसे नेऊन विकतो. ढोर-डुकरवाले विकत घेतात म्हणे. तसेच बेकरीवालेही ब्रेड वगैरे बनवताना कालवतात म्हणे यांचा दळलेला चुरा!

बापाच्या माराच्या धाकानं त्याला धडकी भरली.

उन्हामुळं त्याच्या अनवाणी पायांना चटके बसू लागलेत.

गल्लीच्या टोकाशी त्याच्या कानांवर अकस्मात आवाज आला, 'एऽ पोऱ्या, इकडे ये!'

भाजी-पोळी घेऊन फाटकाशी उभ्या असलेल्या बाईकडे पाहून तो धावलाच; पण तोच दुसरंचं भिकारी लंगडं पोरगं तेथे पोहचलं

अन् त्यानं ती भाजी पोळी पटकावली.

तो लंगड्यावर चडफडला. बाई आत परतली.

'ओ लंगडीच्या ! माह्या गल्लीत काहुन मांगतो बे ? तुले म्हनलं व्हतं नं की माह्या गल्ल्या हैत ह्या तीन म्हनून...'

'ही गल्ली का तुहा बाची है ?'

'लंगड्या तुनं च तं वाटाहिस्सा पाडला व्हता...लयदा झालं हे. नेमी माह्या गल्ल्यातनं मांगून जाते अन् वर त्वांड करते का ?'

'चूपे बुटक्या ! फालतूक बकबक करते. मले वाटीन त्या गल्लीत धसन मी. का म्हननं है तुहं ?' लंगड्यानं त्याला उडवून लावलं.

'लंगडीच्या ! भडव्या !!' अन् तो दात-ओठ खात लंगड्यावर तुटून पडला. आधीच भुकेने त्याचा जीव कातावून गेला होता. मग त्याची अन् लंगड्याची चांगलीच जुंपली. ह्या झटपटीत लंगड्याच्या हातातलं भांड निसटून उलथलं अन् विखुरली भाजी-पोळी कुणा मरतुकड्या कुत्र्याच्या तोंडी गेली.

परस्परांना शिव्या घालीत दोघंही झटपटलेत. त्याने लंगड्याला लाथा-बुक्क्यांनी इतकं बदडून काढलं की लंगड्याच्या तोंडातून रक्ताचा ओघळ बाहेर पडला. गल्लीतली पोरं त्यांच्याभोवती कोंडाळं करून गंमत पहात होती. एका-दोघा माणसांनी दरडावून दोघांना सोडलं अन् हाकलून तेथनं पिटाळलं.

दोघांनी आपापली खाली डबडी उचललीत अन् परस्परांच्या आया-बहिणींचा उद्धार करीत परस्परांना धमकावीत दोघं दोन बाजूंला पांगलीत. लंगड्याच्या तोंडातनं अजूनही रक्त ओघळत होतं. त्याचा खालचा ओठ टरटरून सुजून आलेला दिसत होता. गडव्याचा रट्टा जबरदस्त बसलेला दिसत होता.

मधल्या गल्लीत त्याला भाजी-पोळी मिळाली अन् अध्याश्यासारखा तो रणरणत्या उन्हात चालत चालत खात राहिला. अधनंमधनं खाली सरकणारी चड्डी त्याला वर आवरावी लागत होती.

मघाच्या बस स्टॉपशी तो आला तेव्हा जवळच्या निंबाखाली त्याला लंगड्याला छेडताना काही शाळेतली युनिफॉर्ममधली पोरं दिसली. त्याच्याच कमी-अधिक वयाची. ती पोरं लंगड्याचे हालहाल करीत होती. लंगड्याची जन्मजात असलेली एक बारकी टांग एकजण हातात धरी अन त्याला चौफेर गरंगरं फिरवी. बाकीचे म्हणत–

'अरिंग मिरिंग लोंगा तिरिंग
लोंगा तिरका डुगडुग बाजा
गायीगोपी उतरला राजाऽऽऽ'

मग बाकीचे त्याच्या डोक्यावर सणकून चापट्या हाणीत. हसत–खिदळत. लंगडा केविलवाणा धडपडे. पाणवटल्या डोळ्याने केविलवाणे हातवारे करी. मग ती स्वच्छ पांढऱ्याशुभ्र युनिफॉर्ममधली गोरी-गोमटी पोरं पुन्हा त्याची टांग धरून त्याला उलटासुलटा करीत. त्याच्या फाटक्या चड्डीतनं डोकावणाऱ्या ढुंगणाला चिमटे काढीत. लंगडा तडफडे, विव्हळे, ओरडे !

त्याला काय वाटलं कुणास ठाऊक, तो जो धावला तो–लंगड्याची टांग ओढणाऱ्या पोरावरच तुटून पडला. त्याला त्याने बदडायलाच सुरुवात केली. बाकीची पोरं त्याच्यावर उलटलीत. त्याच्या अंगात हत्तीचं बळच आलं जणू. एकेकाला तो दात-मिशा खात बुक्क्यांनी आडवा-तिडवा हाणू लागला. मुळातच अंगात नसल्यासारखा त्याच्या शर्टच्या पार चिंधाड्या झाल्या. गालावरची जखम उखडल्याचंही त्याला जाणवलं नाही. दरम्यान उघड्या अंगाचा, फाटक्या पॅन्टीचा बारक्या लंगडा उठून बाजूला झाला होता.

तेवढ्यात्त चौकातील ट्रॅफिक पोलीस लगबगीने आला. त्याने त्याचं बखोटं धरून त्याला–चिपकल्या शाळकारी पोराच्या अंगावरून बाहेर खेचला.

'माज चढला का रे भडव्या !'

ट्रॅफिक पोलिसच्या एकाच झापडीनं त्याच्या डोळ्यांपुढं अंधार दाटला. टेलिफोनच्या तारेवरचा कावळा कर्कशल्याचं फक्त त्याला जाणवलं.

त्याला शुद्ध आली तेव्हा सारे पांगलेले होते. लंगड्या तेवढा कटोऱ्यातले तुकडे खात उकिडवा बसून होता. निर्विकारपणे.

तो उठला. खाली सरकलेली चड्डी त्याने वर करधोड्यात अडकविली अन् मग–दुखरी जखम दाबीत लंगड्याला बजावलं,

'लंगड्या, तुले पुना जथै देतो. ह्याफुढं माझा गल्ल्यांत काई मांगले याचं नै. नैतर माझ्याहून कोनी वाईट नै !'

□


तीन राजहंस प्रकाशने

**आणि ड्रॅगन जागा झाला !**
लेखक : अरुण साधू । मूल्य : चवदा रुपये

**फिडेल चे, आणि क्रांती**
लेखक : अरुण साधू । मूल्य । सात रुपये

**पूर्णिया**
लेखक : अनिल अवचट । मूल्य : सहा रुपये

१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०

# राम गणेश गडकरी रंगायतन

## ठाणे शहरातील नवीन नाट्यगृह

सुभाष कलावंत

सांस्कृतिक कार्यक्रम घडविणारे एक विलोभनीय व सर्व तांत्रिक आणि व्यावहारिक सुख-सोयींनी उपलब्ध असे नाटचगृह ठाणे नगरपालिका परिषदेने बांधून इतर पालिका, परिषदा व जिल्हा परिसदा यांच्यासमोर एक आदर्श उभा केला आहे.

'राम गणेश गडकरी रंगायन' हे नाव दिलेली भव्य वास्तू तरण तलावावर उभारली गेली व नगराध्यक्ष सतीश प्रधान आणि त्यांच्या सहकाऱ्यांची ही कामगिरी पहाण्यासाठी ठाणेकर आपल्या पै-पाहुण्यांना समाधानाने आपल्या गावी बोलावू लागला. ठाणे शहर-परिसर सुशोभित करण्यास प्रधानांनी कंबर बांधली. ठाणे रेल्वे-स्टेशनपासून ८ ते १० मिनिटांच्या अंतरावरील मासुंदा तलावाजवळच्या एका पोहण्याच्या तलावाशेजारी संगीत रंगभूमीचे आद्यप्रवर्तक कै. अण्णासाहेब किर्लोस्कर व संगीत रंगभूमीचे नायक व नरश्रेष्ठ कै० बालगंधर्व आणि मराठी रंगभूमीवर शब्दप्रधान व खऱ्या नाटकांचे दर्शन घडविणारे प्रतिभावंत कै. राम गणेश गडकरी यांचे भव्य वास्तुशिल्प ज्या इमारतीवर दिसते तेच मराठी रंगभूमीला नाविन्यतेचा अधिकार देणारे नाटचगृह 'राम गणेश गडकरी रंगायतन' होय.

तपकिरी रंगाचे सावट दूर करून आतील पांढऱ्या व पिवळ्या रंगाकडे वळू लागलो की आपण नाटचगृहात प्रवेश करीत आहोत असे समजून पायऱ्यांवर पावले टाकायची आणि मागे वळून पहायचे म्हणजे दिसते ते अॅल्युमिनियमने तयार केलेले लोककलांचे भव्य चित्रप्रदर्शन—ज्यातून लोककला पुढे आली आणि नाटचकलेचा जन्म झाला. ग्रामीण भागात होणारे सर्व लोककलांचे दर्शन आपल्याला या ३२ × ८ फुटांच्या भव्य कोरीव स्वरूपात होते. त्याच्या समोरील बाजूकडेही एवढ्याच आकाराचा चित्रदर्शक फलक दिसतो. त्यावर सर्व प्रकारची संगीत वाद्ये दर्शविली आहेत. ह्या दोन्ही प्रकारचे प्रत्यक्ष दृष्टिसुख घेणे अधिक महत्त्वाचे व समाधानाचे.

नाटचगृहाच्या बाहेरील पॅसेजमध्ये दिसतात ती पठ्ठे बापूराव, विष्णुदास भावे, प्र. के. अत्रे, मामा वरेरकर इत्यादी नाटचक्षेत्रातील रथी-महारथींची तैलचित्रे, ज्यामुळे या वातावरणात आणखी भर पडेल आणि नाटचगृहात प्रवेश करता-करताच मन नाटचकलेकडे आकर्षित होईल आणि नाटकाचा आनंद मनमुराद लुटता येईल !!

प्रेक्षागृहातील मऊ खुर्चीवर बसलात की समोर दिसेल तो राजस्थानी पद्धतीच्या चित्रप्रकाराचा बारीक पडदा. मखमली पडदा दूर सारून या प्रकारचा आकर्षक आरशांनी मढविलेला पडदा पहाताक्षणीच, तो बनवणाऱ्या कलावंतांचे साश्चर्य कौतुक वाटते. ही खरी कला, जी आपल्या नकळत आपल्या मुखातून दाद घेऊन जाते आणि रसिकतेची पावती देते.

सर्व बाजूंनी, कुठल्याही खुर्चीवर स्थानापन्न झाल्यावर नाटकाचे दर्शनीय रूप पारखून घेता येईल अशी काळजी प्लॅन तयार करतानाच घेतलेली आहे. खालील प्रेक्षागृहात ७५० तर बाल्कनीत ३५० स्थानांची सोय करून एकाच वेळी रंगमंचावरील कलाकृती ११०० जण पाहून आनंद घेऊ शकतील, असे हे भव्य नाटचगृह मराठी रंगभूमीला आज मिळाले. यावरूनच 'नाटचवेडयांचा' भरणा व अभ्यास याची प्रचिती येईल.

४७ फूट लांबीचा आणि २८ फूट रुंदीचा रंगमंच आवश्यक त्या सुख-सोयींनी नटवून या रंगमंदिराने नाटके सादर करणाऱ्या संस्थांना एक आयता सुभाच बहाल केला आहे. रंगमंचाच्या डाव्या बाजूस नेपथ्याचे सामान ठेवण्यास १०–१५ फूट मोकळी जागाही उपलब्ध करून दिलेली आहे. रंगमंचाच्यासमोर संगीत-साथ करणाऱ्या कलावंतांसाठी वा अन्य कोणासाठी एक खास मोकळा भाग ठेवलेला आहे. याव्यतिरिक्त खास दोन रंगपट आणि कलाकारांना रहाण्यासाठी पंधरा खोल्याही तयार केल्या आहेत.

ध्वनियोजना व प्रकाशयोजनेची तांत्रिक माहिती मिळवून त्याचं जास्तीत जास्त समाधान रसिकांना मिळेल याची काळजी रंगमंदिर तयार करताना घेतलेली दिसते. स्पष्ट, स्वच्छ आवाज रसिकांना ऐकू जाईल यासाठी ४५ ध्वनिक्षेपकांसह त्यांच्यावर कंट्रोल ठेवता येईल, अशी रूमही बनविली आहे.

पार्श्वसंगीत व काही खास परिणाम ऐकवण्यासाठी खास व्यवस्था प्रेक्षागृहातील वेगळयाच ध्वनिकेंद्राद्वारे केली असून हे सगळे निर्दोष व्हावे यासाठी भरपूर परिश्रम घेतल्याचे जाणवते.

प्रकाशयोजनेचा प्रगत अभ्यास व विचार लक्षात घेऊन जास्तीत जास्त स्पॉट, कमीत कमी वेळात व फार हलवाहलवी न करता जोडता येऊन त्यांच्याद्वारे प्रसंगनिर्मितीस पोषक प्रकाशयोजना करणं सोपं जावं म्हणून खास स्पॉट, फूटलाइट व फ्लड यांची योजना आहेच. रंगमंचावरील नाटक चित्रित करायचे असले तरी त्यासाठीचे अधिक प्रकाशमान दिवेही आत्ताच तयार करून पुढील कार्याचे स्पष्ट चित्र उभे केले आहे.

प्रेक्षागृहातील सज्जामागे ध्वनी व प्रकाशनियंत्रण कक्ष अंतर्गत दूरध्वनिद्वारे जोडले असून रंगमंचावरील प्रसंग पाहून त्यानुसार नियंत्रण करणे सोइस्कर जावे हाच यामागे उद्देश आहे.

मराठी रंगमंचावरील प्रगत कल्पनांचा अभ्यास बारकाईने करून त्यानुसार जास्तीत जास्त सोयी या वातानुकूलित नाटचगृहात करण्यात आल्याने येथे कलाकृतीचे मूल्य ठरवायला रसिकांना एक आदर्श नाटचगृह परिषदेने उपलब्ध करून दिले आहे.

नाटचगृहाच्या इमारतीत शिरल्याबरोबर समोर कार पार्किंगची सोय आहे. त्याच्या-शेजारी खास तालमीसाठी हौशी व व्याव-सायिक संस्थांकरिता एक दालन उपलब्ध करून दिले आहे. नाटचगृह बांधताना पॅसेज एवढा मोठा व सुसज्ज केला आहे की, नाटक संपताच पाच मिनिटात सर्व प्रेक्षागृह रिकामे व्हावे.

'५५ लाख रुपये खर्चून बांधलेल्या या वास्तूत पावित्र्य टिकविण्याचा प्रयत्न आम्ही जरूर करू', असं आश्वासन ठाणे नगराध्यक्ष सतीश प्रधान यांनी या नाटचगृहाच्या संद-र्भात बोलताना दिलं. तसंच, 'प्रायोगिक संस्था व बालनाटचांना जास्तीत जास्त कमी दरात व इतर व्यावसायिकांना योग्य भाडचात नाटचगृह उपलब्ध करून देऊ', अशी ग्वाही देऊन नाटचगृहाचा उपयोग सांस्कृतिक कला समृद्ध करण्याकडे केला जावा अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

याव्यतिरिक्त ठाणे शहराच्या वैभवात भर घालणाऱ्या अनेक नवीन कार्याची माहिती सतीश प्रधान यांनी या नाटच-समीक्षक, निर्माते, कलाकार, तंत्रज्ञ व स्थानिक कलावंत मेळाव्यात दिली. शाम फडके, दत्तात्रय कापडी, गणेश सोळंकी, अशोक साठे, पी. सावळाराम, शं. ना. नवरे, गो. शं. हुजुरबाजार, वसंतराव कर्णिक, श्रीराम पुजारी, आर्किटेक्ट श्री. पाणसरे यांची सूचनावजा भाषणे झाली. या सूच-नांचा विचार आणि शक्य असल्यास त्यांची अंमलबजावणीही त्वरित करण्याचं आश्वासन मा. प्रधानांनी दिले.

ठाणे शहराच्या वैभवात भर टाकणाऱ्या नाटचगृहाच्या दर्शनी भागावरील वास्तुशिल्पे श्री. सोनवडेकर यांची आहेत, तर वास्तूचे आर्किटेक्ट श्री. पाणसरे हे आहेत. श्री. चंदाचारी व त्यांच्या इतर तीन सहकाऱ्यांनी एका बाजूला सरस्वती तर दुसऱ्या बाजूला मोर असणारा मुख्य पडदा बनविला आहे.


असे हे सर्व सुख-सोयींनी युक्त असे नाटच-गृह उभारून ठाणे नगर परिषदेने मुंबई-करांची गैरसोय दूर केली आहे व डोंबिवली, कल्याण इत्यादी ठिकाणच्या नाटचरसिक व संस्थांची सोय केली आहे.

नाटकीपणाचे सावट सहजपणे दूर सार-णाऱ्या या 'राम गणेश गडकरी रंगायतन'चे उद्घाटन शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते झाले. या नाटचगृहाच्या महोत्सवात अनेक नाटके, बालनाटचस्पर्धा, नाटचसंगीत कार्यक्रम शाम फडके यांनी आयोजित केले होते, तर श्री. के. टी. देशमुख यांचे नाटचचित्रांचे व जुन्या दुर्मिळ साहित्य व फोटोंचे सुरेख प्रदर्शनही या वेळी भरले होते.

मराठी रंगभूमीच्या या नव्या नाटचगृहास आमच्या हार्दिक शुभेच्छा ! □


**हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?**
**राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?**

या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी........



# नाझी भस्मासुराचा उदयास्त

लेखक : वि. ग. कानिटकर
आवृत्ती : तिसरी (सचित्र)
किंमत : रुपये पंचेचाळीस
राजहंस प्रकाशन, पुणे

रंगभूमी । शिरीष सहस्रबुद्धे

(कै.) स्नेहलता रेड्डींची

# ‘ सीता ’

## मग रामाची सीता कोण?

आणीबाणीच्या काळानं स्नेहलता रेड्डी या ख्यातनाम कलावतीचा बळी घेतला त्या गोष्टीला गेल्याच महिन्यात दोन वर्षं पूर्ण झाली. याआसपासच त्यांनी लिहिलेल्या ‘सीता’ या नाटकाच्या, श्रीमती सरिता पदकी यांनी केलेल्या मराठी अनुवादाचं नाट्यवाचन, ‘अक्षर’ या पुण्यातील तरुणांच्या नवोदित संस्थेतर्फे सादर करण्यात आलं. त्याच्या काही काळ आधी हाच अनुवाद जनबोध प्रकाशनातर्फे पुस्तकरूपानं प्रसिद्ध केला गेला. प्रस्तुत टिपणात यापैकी कशाचंच समीक्षण वगैरे करण्याचा आग्रह नसून, त्यानिमित्तानं निर्माण होणाऱ्या काही मुद्द्यांचा आणि प्रश्नांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न आहे.

‘सीता’ ते नाटक सर्वस्वी रामायणाच्या अंतिम पर्वाभोवती फिरते. दोन अंकी बहुप्रवेशी अशा या लघुनाटचाची सुरुवात होते, तीच राम-रावण युद्ध संपून गेलेल्या रणांगणावरच. सीतेची सुटका, रामानं तिचा स्वीकार करण्यापूर्वी घातली गेलेली अग्निदिव्याची अट आणि त्यातून उद्भवलेला शोकांत, ही नाटकाची मध्यवर्ती कथाकल्पना. अर्थात वाल्मीकीकृत रामायणाचा शोकांत आणि स्नेहलता रेड्डीकृत शोकांत यात जमीन-अस्मानाचे अंतर आहे. मूळ रामायणात अग्निदिव्याची ही अपमानास्पद अट सीतेनं मान झुकवून स्वीकारली आहे आणि आपणावर शुद्धशीलत्वाचं शिक्कामोर्तब करून घेतलेलं आहे—त्यायोगे पुढील घटनांचा आणि अंतिम शोकनाटचाचा (भूमिप्रवेशाचा) मार्ग मोकळा केलेला आहे. स्नेहलता रेड्डींनी या कथेला, रणभूमीवरच विलक्षण कलाटणी देऊन ती तेथेच जवळजवळ संपवली आहे. पारंपारिक रामकथेशी त्यांनी स्वतःला कुठंच बांधील मानलेलं नाही. त्यांना कर्तव्य आहे ते सीतेशी आणि त्याहीपेक्षा सीतेला प्रातिनिधिक स्वरूप देऊन तिच्याद्वारे करायच्या विचारप्रसाराशी. (‘प्रचार’ हा शब्द एकंदरीत लोकांना खटकतो, म्हणून विचारप्रसार म्हणायचं एवढंच. एरवी हे नाटक बऱ्यापैकी भडक प्रचारकी स्वरूपाचं आहे, असं स्पष्टपणे म्हणायला हरकत नाही. अर्थात त्यात अभिमान किंवा ओशाळलेपणा यापैकी काहीच वाटण्याचं कारण वस्तुतः नाही. प्रचार हा शब्द निंदास्पद अर्थानं वापरण्याचं/वागवण्याचं काहीच कारण नाही. सर्जनशील कलाकाराला आपलं माध्यम मतप्रचारार्थ राबवण्याचं स्वातंत्र्य जितकं असावं, तितकंच न वापरण्याचं स्वातंत्र्यही असावं एवढंच काय ते !) आणि याच भूमिकेतून लेखिकेनं रंगविलेली जागृत स्त्रीशक्तीची प्रतिमा सीता अग्निदिव्याला नकार देते, धर्माच्या अवडंबराखाली पददलितांचा—खास करून स्त्रियांचा—आवाज दडपून टाकणाऱ्या वसिष्ठादि पुरोहितांचा धिक्कार करते, पत्नीप्रेमापेक्षा राजपदाची महत्ता अधिक मानणाऱ्या रामाची कडक शब्दांत निर्भर्त्सना करते आणि स्वतःच रामाचा त्याग करून रावणाच्या चितेच्या दिशेनं पावलं उचलते. अर्थातच रामायणाचा केंद्रबिंदूच बदलतो आणि हा बदल म्हणजे या पुराणकथेच्या उत्तरकांडाचं केवळ Re-interpretation न होता नवनिर्माणच ( Re-creation ) होतं. रामायणातल्या वव्हंशी Submissive अशा सीतेशी रेड्डींच्या बंडखोर सीतेचं कुठंच नातं जुळत नाही, किंबहुना स्नेहलता रेड्डींचं हे नाटक ही, रामायणसदृश पात्रं उचलून पण त्यांच्या अस्तित्वाचा आशय बदलून निर्मिलेली हेतुप्रधान अशी स्वतंत्रच दंतकथा (Myth) मानणं योग्य होईल असं मला स्वतःला वाटतं. तसं करण्यातही काही गैर नाही आणि मानण्यातही अर्थातच नाही. पुराणकारांनी व त्यानंतरच्या भाष्यकार/विचारवंतांनी सीतेवर केलेला अन्याय तिच्या दारुण व्यथेच्या बाजू नीट समजावून घेण्यात तत्कालीन व तदोत्तरकालीन पुरुषांनी दाखविलेलं कार्पण्य, सहानुभूतिशून्यता याबद्दल नाराज असलेल्या लेखिकेनं सीतेचं आपल्या आदर्शांना भावणारं एक चित्र इथं रेखाटलं आहे. त्याला कुणाचीच हरकत नसावी आणि ते चित्र इतरांना मानवलं नाही, तर त्याबाबत लेखिकेला (पूर्वी) अथवा अन्य कुणालाही खेद वाटण्याचं कारण नव्हतं/नाही.

‘सीता’ची मांडणी एकदा अशा प्रकारे केली की, लेखिकेच्या दृष्टीनं त्यातल्या विचारप्रवाहांनाच प्राधान्य येतं, हे उघडच होतं. त्यातल्या मुख्य विचारसूत्राशी ‘रामचंद्राकडून सीतेवर अन्याय झाला’ या विचाराशी सहमत होणाऱ्यांची संख्या थोडी नाही. हा विचारही फारसा नवा नाही. पुस्तकाच्या प्रारंभी मांडलेल्या आपल्या भूमिकेत लेखिकेनेही डॉ. लोहिया व राजाजींसारख्या ज्येष्ठ समविचारी व्यक्तींकडून मिळालेल्या प्रेरणेचा उल्लेख केलेलाच आहे. तर प्रकाशकीय प्रस्तावनेत श्री. जवाहर कोटेचा यांनी नाटकाच्या क्रांतिकारी आशयाचं सुस्पष्ट विश्लेषण केलेलंच आहे.

> ‘सीतेसारखा चिरपरिचित विषय चिरपरिचित शब्दांतून त्यांनी अशा काही खुबीदारपणे (म्हणजे नेमकं काय ?) मांडला आहे की, तो बेचैन करतो. रामायणातली सीतेची कथा स्नेहलता रेड्डींनी अशा एका नव्या चौकटीत उभी केलेली आहे की, स्त्री-जीवनाचे चिरकालीन दुःख त्यात दाटून आल्यासारखे वाटते. ‘सीता’ कथा स्त्रियांची युगायुगाची वेदना अशा काही रेखीव पद्धतीने मांडते की, एका बाजूला माणूस विस्मयचकितही होतो आणि दुसऱ्या बाजूला तो इतका

बेचैन होतो की, जीवनाचा स्थिर वाटणारा पायाच त्यामुळे हादरून जातो.'

आता, कुठल्याही पुस्तकाच्या प्रारंभी रीत म्हणून छापले जाणारे प्रकाशकाचे दोन किंवा चार शब्द, हे समारंभातल्या आभाराच्या गोड औपचारिक भाषणाप्रमाणेच, गंभीरपणे न घेण्याची प्रथा असल्यामुळेच संदिग्धता, पुनरावृत्ती आणि अतिशयोक्ती अशा अलंकारांनी अनुक्रमे समृद्ध असलेल्या या तीन वाक्यांचा अधिक परामर्ष मी घेत नाही. तथापि स्नेहलता रेड्डींनी सीतेच्या कथेची फक्त चौकटच बदलली आहे, असं प्रकाशकांना वाटत असेल, तर आम्हा दोघांपैकी कुणा तरी एकालाच हे नाटक समजलेलं आहे, एवढंच मला म्हणता येईल. असो. लेखिकेच्या वैचारिक आशयासंबंधी बोलायचं तर प्रथमतः सीतेची प्रतिमा पुरेशा प्रभावीपणे व ठळकपणे उभी करण्यात तिला अपयश आलेलं आहे असं मला वाटतं. विशेषतः एक व्यक्ती म्हणून आणि एक प्रतिनिधी म्हणून सीतेची जी रूपं आहेत, त्यांचं अस्तित्व इथे पुरेसं एकाकार व स्पष्ट होत नाही. सीतेचा प्रश्न, तिनं विचारलेले सवाल यांना धड व्यक्तिगत अर्थ येत नाही आणि धड वैश्विक महत्ताही प्राप्त होत नाही. उदाहरणार्थ, सैनिकांकडून बलात्कार केल्या गेलेल्या धोबिणीचं आणि तिला नाकारणाऱ्या तिच्या नवऱ्याचं जे उपकथानक लेखिकेनं उभं केलेलं आहे, ते एकाच वेळी व्यक्तिगत व कौटुंबिक समस्येच्या स्वरूपाचं असूनही वैश्विक होऊन जातं–दोन महायुद्धांच्या किंवा फाळणी, बांगला देश युद्धासारख्या प्रसंगी झालेल्या बलात्कारांची आठवण करून देतं. सीतेच्या बाबतीत मात्र तीच व्यक्ती म्हणून झालेला मानभंग आणि स्त्री म्हणून तिला जाणवलेला अन्याय हे दोन कप्पे कुठे तरी वेगळे पडतात. पहिल्या अंकातल्या तिसऱ्या व चौथ्या प्रवेशात रामाच्या पतिप्रेमाला आवाहन करणारी पत्नी सीता त्यानं प्रेमापेक्षा कर्तव्य श्रेष्ठ असल्याचं सांगताच तो व्यक्तिगत अवमान मानणारी सीता आणि एकप्रवेशी दुसऱ्या अंकात अखिल स्त्री जातीची व्यथा मांडणारी प्रातिनिधिक सीता हे सरळसरळ दुभंग व्यक्तिमत्त्वाचं उदाहरण वाटतं. प्रश्न असा पडतो की, पुरुषी वर्चस्वाखालील जुलमाची जाणीव होऊन त्याविरुद्ध बंड पुकारण्यामागे सीतेची स्वतंत्र प्रज्ञा आणि विकसित विचारसरणी होती की, नवऱ्याने निरपवादपणे स्वीकारण्यास नकार दिल्यानं झालेल्या व्यक्तिगत अपमानाची खंत? स्वतंत्र प्रज्ञा / विचार असेल, तर नाटकाच्या पहिल्या अंकात त्याचा पुरावा दिसत नाही आणि वैयक्तिक डंख असेल, तर त्याचा अर्थ असा होतो की, रामानं सीतेचा निरपवादपणे स्वीकार केला असता, तर दुसऱ्या अंकात मांडली गेलेली कैफियत मूकच राहिली असती-नव्हे, सीतेला समस्त स्त्रीजातीवरच्या युगायुगांच्या अन्यायाची जाणीवही झाली नसती! स्नेहलता रेड्डींच्या विचारांची–युक्तिवादाची मांडणी अत्यंत ढिसाळ पायावर झालेली आहे, असं यामुळंच वाटतं. चित्र दिसतं ते असं की, एखाद्या संस्थानिकाचा तनखा बंद केल्यानंतरच त्यानं आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाच्या दुःस्थितीचा पुकारा करावा, तद्वत पहिला अंकभर पतिपत्नींच्या प्रेमाविषयी अत्यंत गोडधोड भाषेत रोमॅन्टिक अपेक्षा/कल्पना व्यक्त करणारी सीता आपल्या भावनेचा अव्हेर होताना दिसताच एकदम स्त्रीमुक्तीच्या बंडाचा झेंडा फडकाविते.

बरं, हे बंड करून ती साधते काय? तर रामाला आपला त्याग करण्याची संधी न देता ती स्वतःच त्याचा त्याग करते आणि रावणाच्या चितेच्या दिशेनं चालू लागते. एकंदरीतच सीतेच्या जीवनातलं स्नेहलतादेवींनी निर्मिलेलं हें रावण प्रकरण Comic relief म्हणून योजिलेलं असेल, तरच सहनीय आहे, एरवी ते हास्यास्पद आहे. या नाटकात रावण हा खरा नायक आणि राम हा खलनायक असावा अशाच पद्धतीनं दोघांची चित्रणं करण्यात आलेली आहेत आणि रावणाचं आपल्यावर खरं प्रेम असल्याची घोषणा सीता सतत करीत असते; यातून करमणूक होते, नाही असं नाही; पण वैचारिक गडबडही त्यात दिसते. रावणाचं सीतेवर 'खरं' प्रेम होतं म्हणजे नेमकं काय, याचा खुलासा कुठेही नाही. तो म्हणे तिच्याशी मन मोकळं करून बोलत बसायचा आणि त्या दोघांमध्ये खूप understanding वगैरे होतं. (बाय द वे, रावणाला हा प्रकार मंदोदरीच्या बाबतीत करून तिच्यावरचा अन्याय कमी करता आला नसता काय?) आपल्या पत्नीची बंदिवासातून सुटका करण्यासाठी युद्ध खेळणारा राम हा स्वार्थी आणि दुसऱ्याच्या बायकोला दगलबाजीनं व तिच्या असहायतेचा गैरफायदा घेऊन पळवून नेणारा रावण हा खरा प्रेमिक हा कुठला स्वर्गीय न्याय रेड्डीबाईंना स्फुरला राम जाणे! स्त्रीमुक्तीची तरफदारी करण्याच्या नादात रावणाची प्रतिमा उजळ करण्याइतपत भरकटत जाण्याचं त्यांना काय कारण दिसलं असावं? मराठीत, कलुषा कबजीपासून सूर्याजी पिसाळापर्यंतच्या नाना ऐतिहासिक खलपात्रांना साधुत्वाची रंगसफेती करणारा जो लोकसंप्रदाय आहे, त्याचा प्रभाव स्नेहलतादेवींवर कितपत होता कोणास ठाऊक; पण रावणाचा संबंध दूरान्वयानंही पोचत नसताना कथानकात त्याला ओढून त्यांनी आपली वैचारिक बाजू विनाकारणच दुबळी करून ठेवली आहे. शेवटीसुद्धा, पुरुषांच्या अन्यायाला विटलेली बंडखोर सीता रामाचा त्याग करते, तेव्हा (इब्सेनची नोरा वगैरे आठवून!) ते रास्तच वाटतं; पण मग तिनं रावणाकडं जायचं समर्थन काय? स्त्रीला अखेरीस पुरुषाशिवाय (त्यातल्या त्यात 'खरं' प्रेम करणाऱ्या पुरुषाशिवाय) राहताच येणार नाही की काय? पुरुष तेवढे अन्यायी, तर रावणाचा अपवाद (खरं तर त्याच्या चितेचा आणि स्मृतींचा अपवाद!) कशाच्या आधारावर करायचा? आणि सीतेच्या शुद्धतेबाबत शंका घेणारा राजा राम अन्यायी, तर त्या तथाकथित कलंकाला जबाबदार असणारा आणि आपल्या पत्नीला दुर्लक्षून दुसऱ्याच्या पत्नीवर 'खरं' प्रेम करायला धावलेला राजा रावण न्यायी कसा काय ठरतो? सारांश, सीतेकरवी लेखिकेनं मांडलेली स्त्रीची कैफियत स्थलकालस्थितिनिरपेक्ष सत्य असली, तरी ती कठोर वास्तववादी विचाराऐवजी व्यक्तिगत वैफल्याच्या पायावर उभी असल्यानं ठिसूळ झालेली आहे आणि तिचा कळस तर उभाच राहत नाही.

ही कैफियत मांडण्याच्या शैली / पद्धतीविषयी लिहिण्यासारखं फारसं काही नाही. क्रांतिकारी आशय व्यक्तविणारी ही शैली क्रांतिकारी वाटावी इतकी 'न–शैली' आहे, non–specific आहे. मात्र लेखनाला काही

शैली, काही फॉर्म आहे, असं गृहीत धरलं तरीसुद्धा श्री. जवाहर कोटेचा यांनी 'प्रकाशकीया'त उल्लेखिलेला खुबीदारपणा आणि रेखीव पद्धती यांचा मागमूसही नाटकात कुठे दिसत नाही, हे नमूद करणं भाग आहे. एक तर वापरलेल्या भाषेला सुसंगती म्हणून काडीची नाही. राम आणि सीता यांचे अनेक प्रेमसंवाद थेट हिंदी फिल्मी ढंगानं चालतात, ('लाडक्या रामा, मला विसरून गेलास तू?' वगैरे) तर त्यांचे खटके उडतात तेव्हा आपण 'चालू जमाना, पुन्हा प्रपंच' किंवा तत्सम 'आकाशवाणी' श्रुतिका ऐकत असल्याचा किंवा एखाद्या झोपडपट्टीवजा चाळीच्या चौकात उभे असल्याचा भास होतो. (उदा. राम: (चिडून) मला जमेल तेवढं प्रेम करतोय मी तुझ्यावर!' किंवा 'सीता: तू माझा उपभोग घेतलास, फसवलीस, आणि सोडून गेलास! तू माझा खुनी आहेस!') जोडीला धोबी, धोबीण, सैनिक इत्यादी फाजील महत्त्व मिळालेल्या बांडगुळी पात्रांची शहरी ग्रामीण भाषा आहेच. (या सगळ्यात मराठी अनुवादकारांची भूमिका, वाटा काय असेल याबद्दलही मला कुतूहल आहे. प्रयत्न करूनही नाटकाचं इंग्रजी स्क्रिप्ट मात्र हाती लागलं नाही, याचं वाईट वाटतं.) या पार्श्वभूमीवर सीतेची लांबलचक स्वगतं काव्यमय भावेसह येतात, तेव्हा ती त्रासदायकच होतात. तीच गोष्ट पुरोहितांच्या संस्कृतप्रचुर भाषेची. राम आणि सीता बहुसंख्य काळ विसाव्या शतकातल्या चालू बोलीभाषेत संभाषण करीत असताना, वसिष्ठांची भाषा तेवढी वैदिक कशासाठी?

'अक्षर'च्या कलाकारांनी आणि जनबोध प्रकाशनच्या सर्व संबंधितांनी (अनुक्रमे) नाटकाचं वाचन आणि पुस्तक शक्य तितक्या नेटकेपणानं श्रोते – वाचकांपर्यंत पोचवायचा प्रयत्न केला, हे लिहिलं पाहिजेच.

नव्या वाटा शोधणं, नव्या Myths निर्माण करणं किंवा जुन्या पुनर्निर्मित करणं आणि आपला Message पोचवायला वापरणं हे स्वागतार्हच; पण त्यांचं चौफेर अपयश हे रुळल्या वाटेवरच्या अपयशापेक्षाही अधिक दारुण असतं. असे प्रयत्न व्हायला जशी हरकत नसावी तशीच ती, ते फसल्याचं मत व्यक्त करायलाही नसावी, असं वाटतं. □

# ड्रॉपर्सचे दोन दीर्घांक

दोन–अडीच वर्षांपूर्वी भरत नाटचमंदिराच्या नाटचशाखेत विलीन झालेली 'ड्रॉपर्स' ही पुण्यातली एक बऱ्यापैकी नावाजलेली तरुणांची प्रायोगिक नाटचसंस्था. अशा तऱ्हेचं त्यांचं ऐक्य किंवा विलिनीकरण हे त्या वेळी अनेकांना जितकं आश्चर्यजनक वाटलं होतं, तितकं आश्चर्य ड्रॉपर्स पूर्ववत् विभक्त झाली तेव्हा निश्चितच वाटलं नाही. अलीकडेच पुनश्च हरिःओम् करणाऱ्या या संस्थेनं गेल्या आठवडचात दोन दीर्घांक ऊर्फ प्रदीर्घ एकांकिका सादर करून आपलं अस्तित्व जाणवून दिलं.

'क्षितिजापर्यंत समुद्र' (लेखक: महेश एलकुंचवार) आणि 'राजाचा खेळ' (लेखक वृंदावन दंडवते) हे ते दोन दीर्घांक. दीर्घांक हे शीर्षक बऱ्यापैकी आकर्षक वाटलं असलं तरी प्रत्यक्षात या दीर्घांकांनी प्रेक्षकांच्या सहनशीलतेचा चांगलाच प्रदीर्घ अंत पाहिला. निदान पहिल्या दीर्घांकानं तरी प्रायोगिक रंगभूमीबद्दल आस्था बाळगणाऱ्या अनेक सर्वसामान्य रसिकांना तिच्यावरील तंत्राधीनतेच्या ज्या प्रादुर्भावाबद्दल ते नाराज असतात, त्याचाच नमुना 'ड्रॉपर्स' इतपत समजूतदार ग्रुपकडून पाहायला मिळेल अशी अपेक्षा नसल्यानं सखेद आश्चर्य वाटलं.

'क्षितिजापर्यंत'शी महेश एलकुंचवारचं नाव निगडित असल्यानं आणि या नाटचाचा (माझ्या माहितीनुसार) पुण्यातला हा पहिलाच दखलपात्र जाहीर प्रयोग असल्यानं, जमलेल्या सर्वांनाच खूप उत्सुकता असणं स्वाभाविक होतं. महेशच्या नाटचप्रयोगांची कथानके अनेकदा मानसिक/शारीरिक विकृतीभोवती घोटाळणारी असली आणि त्याच्या किंचित शब्दजड, अलंकारिक भाषाशैलीची पुनरावृत्ती विशेष सुखद नसली, तरीही नाटचलेखनाकडे जीवनानुभवसंक्रमणप्रक्रिया म्हणून गांभीर्यानं बघणारा आणि समर्थ आशयघन कथावस्तु सहज डौलदारपणे शब्दबद्ध करणारा एक दुर्लभ नवनाटचकार म्हणून तो ओळखला जातो. मात्र त्याची ही ओळख 'क्षितिजापर्यंत समुद्र'ला लागू पडण्यासारखी नाही. इतकं लिहून इतकं थोडं Communicate केल्याचं महेशच्या बाबतीतलं एक दुर्मिळ उदाहरण म्हणजे दीर्घांक. सुमारे सव्वा तासाच्या या प्रयोगानंतर लेखक (पर्यायानं दिग्दर्शक, पर्यायानं कलाकार) 'काय शोधतोय ते माहीत नाही, कुठल्या वाटेनं शोधायचं ते माहीत नाही...' अशा काहीशा संदेहसंपन्न दिशाहीनपणे भरकटतोय, हाच ठळक ठसा माझ्या मनावर शिल्लक राहिला. एक वृद्ध धनिक आणि त्याची तीन षंढ मुलं यांची काहीशी कौटुंबिक वळणाची संघर्षपूर्ण कथा मांडणारी ही एकांकिका दिग्दर्शकानं ज्या पद्धतीनं हाताळली, तो प्रकार गोंधळात भर टाकणाराच होता. धनिक कर्तबगार बापाशी संबंधित असा नाटचांश पारंपारिक संवाद–अभिनयपद्धतीनं सादर करण्यात आला, तर तीन मुलं आणि त्यांच्या बायका यांच्या संदर्भातला नाटचभाग कोरसच्या धर्तीनं, नवनाटचातली खास समूहदृश्यं वापरून सादर करण्यात आला. ही सहा मंडळी शालेय लोकनृत्याच्या धर्तीवर सतत निरनिराळ्या संरचना (formations) करून दाखवीत होती व विशेषत: त्यातील तिघे तरुण, अनेक (की बहुसंख्य?) वाक्ये कोरसच्या पद्धतीनेच उच्चारीत होते. हा सगळा नाटचांश इतका मेकॅनिकल आणि अतएव कंटाळवाणा होत होता की, बाकीच्या नाटचांशाच्या यथार्थवादी लय-तालाशी त्याचा कुठे सांधाच जुळत नव्हता. नाटचानुभवाची एकसंधता यामुळे कुठेच प्रस्थापित होऊ शकली नाही. या खंडितपणा–विस्कळितपणामागे काही तात्त्विक भूमिका असलेच, तर संबंधितांशी चर्चा करायला मला आवडेल–आवडलं असतं. अर्थात अशी भूमिका असलीच तरीही तिचं मूर्त स्वरूप पाहणं त्रासाचंच होतं हे खरंच. बहुसंख्य पात्रांची अस्पष्ट संवादफेक व तिघा भावांचा एकसुरीपणा याचाही त्रास बराच झाला. वृद्ध पित्याची भूमिका करणारे (बहुधा) श्री. दिलीप कोल्हटकर यांनीच हा दीर्घांक सुसह्य करण्यात मोठा वाटा उचलला.

'राजाचा खेळ' या एकांकिकेनं तर संदिग्धतेचा कळसच गाठला. मुळात, प्रस्तुतीकरणाच्या दृष्टिकोनातून पाहता हा खेळ राजाचा न होता चारएक विदूषकांचाच झाला. या विदूषक मंडळींनी नाना अचकटविचकट शारीरिक कसरती करून रंगमंच व वेळ बराचसा व्यापलाच, खेरीज करमणुकीचाही मोठा वाटा उचलला. अर्थात मूळ गोची आहे–असली पाहिजे–ती संहितेतच. नाटक ऐकताना, लेखकाला कुठे तरी काही तरी खरंच म्हणायचंय. काही गंभीर विचार कल्पना–शेरा-वस्तुस्थिती मांडायचीय, शासन राज्य इ. कल्पनांसाठी काही मूलभूत चर्चा–किमानपक्षी टीकाटिप्पणी–करायचीय असं अखंड वाटत राहतं; पण तेवढंच. कोणतीही विशिष्ट क्षेत्रं, समस्या, त्यांचं स्पष्ट चित्रण/समीक्षण होत नाही. क्वचित कुठे राजकीय वा सामाजिक संदर्भ असल्याची शंका येते न येते तोच तो सूक्ष्म-क्षीण संदर्भ विरूनही गेलेला असतो आणि मग शिल्लक उरते ती एकाचढ एक संदिग्ध–क्वचित निरर्थक वाक्यांची उतरंड आणि रंगमंचावर सराईतपणे वावरू शकणाऱ्या शरीरांची सर्कस. अक्षरशः कसरत, जी दिग्दर्शकानं चोख ठोकून घेतली आहे आणि कलाकारांनी तयारीनं पार पाडली आहे; पण एवढ्या क्रेडिटवर ड्रॉपर्सवाल्यांनी संतुष्ट रहावं असं त्यात काही नाही. प्रायोगिक सफाईच्या दृष्टीनं ही एकांकिका 'क्षितिजापर्यंत समुद्र'च्या तुलनेत थोडी उजवी होती इतकंच काय ते. लेखनात मात्र डावं–उजवं करणं अवघडच. असो.

प्रस्तुत दीर्घांक मला समजलेच नसतील हीही एक शक्यता आहेच. तेव्हा चूकभूल देणे घेणे.



चित्रपट । अशोक प्रभाकर डांगे

# चमेली मेमसाब

कधी कधी आपण असे तसेच जातो आणि असे तसेच परतही येतो. अंतरंगात अपेक्षा अशा नसतातच आणि तशा त्या करण्यालाही कसलाच अर्थ नसतो. कारण ती कलाकृतीच मुळात आपणाला जशी जवळची नसते तशी तेवढी ती दूरचीही नसते. केवळ कसलं तरी कुतूहल म्हणूनच जावं, बरं दिसेल तर खुल्या दिलानं पहावं. तसं नसेल तर रित्याच मनानं परत फिरावं. मिळवल्या–गमावल्याचं भान विसरावं एवढाच आपला विचार असतो.

चमेली मेमसाब पहायला जाताना अशाच अर्ध्या-मुर्ध्या मनःस्थितीत आपण असतो. आपल्याच भुईच्या कानाकोपऱ्यात वस्ती करून रहाणारी आसामी माणसं त्यांची आदिम भाषा, चित्रविचित्र संस्कृती या साऱ्यापास्नं आपण चांगले चार हात दूरच असतो. त्यांच्या चित्रपटांची तर गोष्टच दूरची; पण पारितोषिकविजेतेपदाची बिरुदावली पहाताच आपण आपल्या विचारांचं शीड बदलतो. वाहत्या वाऱ्याची दिशा पकडतो. क्षणार्धात मनाची मरगळ झटकून काढतो. साऱ्याच संदर्भाचा वेगळा विचार करतो. बोथट संवेदनांना नवी धार लावतो. जुने संकेत मोडून नवे आडाखे उभारतो. नव्या अपेक्षांची नवी अडवी मांडतो आणि 'चमेली मेमसाब' सारखा चित्रपट आता गंभीर होऊन पहायला लागतो.

एरवी आपल्या दृष्टीतला आसाम चहाच्या असंख्य मळ्यांपुरताच मर्यादित असतो आणि हा आसामी चित्रपटही त्याहून वेगळा नसतो. मैलोनमैल डोंगर व्यापणारे खुज्या झुडपांचे मळे, त्यांच्यावर दाट सावली धरणारे उंच उभे वृक्ष, बांबूच्या टोपल्या डोक्यांवर घेऊन वावरणाऱ्या, चहाची पानं वेचणाऱ्या गोऱ्या गोबऱ्या आसामी स्त्रिया, हे सारं वातावरणच आपणाला नवं असतं, नवखं असतं. म्हणून तर त्यातलं तरल ताजेपण आपणाला अगदी सरळ सहज मोहवून टाकतं. अशाच एका आसामी मळ्याचा बार्टलीसाहेब मॅनेजर असतो आणि आपल्या अंदाजाला अनुसरूनच तो साहेब वसाहतवाल्यांच्या देशातच जन्मलेला असतो. इथे स्वातंत्र्य उंबरठ्याशी येताच मायदेशी पळ काढणाऱ्यांचा कित्ता बार्टलीसाहेबानं गिरवलेला नसतो; म्हणूनच बार्टलीसाहेबाबद्दल बऱ्याच जणांना अजनदेखील कुतूहल वाटत असतं. ते सारं गाव म्हणजे बार्टलीसाहेबाचंच एक साम्राज्य असतं. ते सारं गावच त्याच्या चहाच्या मळ्यावर मोलमजुरी, नाही तर कुठलं ना कुठलं काम करत असतं. मग हे काम मळ्यात चहाची पानं खुडण्याचं असो, नाही तर कंपनीच्या ऑफिसात कारकुनी करण्याचं असो. ह्या साऱ्याच साम्राज्यात म्हणून तर बार्टलीसाहेबाचं स्थान महत्त्वपूर्ण असतं. एकदा ह्या साऱ्या संदर्भात वेगळंच काही तरी घडून जातं. रस्त्यात नाचत–बागडत जाणारी मळेकरी मुलगी चमेली बार्टलीसाहेबाच्या गाडीपुढे आडवी येते. बार्टलीसाहेब करकचून ब्रेक मारतो. अपघाताच्या जाणिवेनं हादरतो. चाकाखाली जाऊन बघतो तर तिथे कुणीच असत नाही आणि खटयाळ खोडकर चमेली समोरच्याच झाडाखाली निखळपणे हसत असते. चमेलीच्या त्या नुसत्या आविर्भावानेच बार्टलीसाहेब गार पडतो. त्याचा संताप मावळतो एवढंच नव्हे तर त्या रागाचं लगोलग अनुरक्तीतही रूपांतर होऊन जातं. बार्टलीसाहेब आपल्या प्रतिष्ठेचा बुरखा तिथेच टरकावून टाकतो आणि त्या गरीब मजुराच्या गोंडस मुलीवर मनापास्नं प्रेम करायला लागतो.

एकाकी जीवन जगणाऱ्या बार्टलीसाहेबाला आता नवा अर्थ सापडतो. ह्या प्रेमाच्या बाबतीत धर्म, वंश, प्रतिष्ठा असले क्षुल्लक विचार त्याला बिनमहत्त्वाचे वाटतात. एकदा चमेलीवर आषक झालेल्या एका दारुड्याच्या तावडीतनंही तो तिची अचानक सुटका करतो आणि आणखी एकदा स्वतःच्या बंदुकीनं टिपलेले दोन पक्षी तिला भेट म्हणून आदा करतो. बार्टलीसाहेबही अखेर साहेब असला तरी माणसासारखाच एक माणूस असतो. त्याचं एकाकीपण त्याला अधिक थांबू

द्यायलाही तयार नसतं. बार्टलीसाहेब सरळ चमेलीलाच आपल्या बंगल्यावर बोलावून घेतो. चमेलीचा बाप संतापतो. मग चार दोस्तांना जोडीला घेऊन बार्टलीचा बंगला गाठतो. आपल्या अन्नदात्या साहेबालाच जाब विचारायचं बळ त्याच्यात असत नाही; पण बार्टलीसाहेबच एक अनपेक्षित धक्का त्याला देतो. आपल्या मोडक्या-तोडक्या हिंदीत तो चमेलीच्या बापाला सांगून टाकतो, 'मी चमेलीला माझी मेमसाब बनवणार आहे. आणखी पंधरा दिवसांनी लग्नसमारंभ होईल!' चमेलीलाही असं काही ध्यानी-मनीही नव्हतं. अचानक एखादं घबाडच हाती आल्यासारखी तिची अवस्था होते. तिच्या दारुड्या बापाला तर अस्मानच ठेंगणं झाल्यागत होतं आणि वर त्याला मुकादम करायचं तोंड भरून आश्वासनही बार्टली-साहेबानं दिलेलं असतंच!

अखेर धर्मगुरूच्या साक्षीनं तो आगळा-वेगळा विवाह संपन्न होतो. एका दारुड्या मळेमजुराची अवखळ, अनजान तरुणी, चमेली, चमेली मेमसाब होऊन जाते! तो भव्य भारदस्त बंगला, त्यातलं कलाकुसरीचं फर्निचर, उंची मद्य हे सारंच त्या खेडवळ गरीब पोरीला अलोलकीचं असतं. त्यातल्या विदेशी मद्याची तर तिला इतकी गोडी लागते की रात्री-बेरात्री बार्टलीसाहेबाची नजर चुकवून ही नवपरिणित मेमसाब मद्याच्या अख्ख्या बाटल्या पचवू लागते. येवढं सारं होऊन देखील बार्टलीसाहेब चांगलाच समजूतदार निघतो. त्या अल्लड अजाण मुलीला तो नीट समजावून घेतो. तिच्या बुभुक्षितपणाकडे कानाडोळा करतो. तिच्यात चुकता बदल घडवून आणायचा निश्चय करतो आणि तसा वागतो देखील.

बार्टलीसाहेब चमेलीला स्वतःबरोबर सन्मानानं गाडीतून फिरवतो, मिरवतो; पण मधून-मधून चमेली मूळ वळणावरच जाते. अशा मूडात ती जत्रेतल्या लाकडी घोड्यावर बसून गिरक्या घेते. उंच फिरत्या चक्राची मौज लुटते. लहान मुलीसारखीच खोट्या मण्यांची माळ घालून मजेत मिरवते. तिचं हे प्रतिष्ठा खुंटीला टांगणं बार्टलीसाहेबाला रुचत नाही. तो तिला नव्या सवयी लावू पहातो. तिच्यात सुसंस्कृतता नव्यानं रुजवू पहातो. तिला आधुनिक कपड्यांत आणि उंची दागिन्यांत वावरायला शिकवतो. एका खेडूत पोरीचं एका सुसंस्कृत मेमसावमध्ये सर्वांगीण रूपांतर घडवून आणण्याचा बार्टली-साहेबाचा निश्चय असतो.

सगळं काही सुरळीत सुरू. सगळा गाव एका आसामी मुलीशी घरोबा केल्यामुळं बार्टलीसाहेबावर खूश. बार्टलीसाहेब चमेली-वर खूष, तर चमेली मेमसाब झाल्यानं मिळा-लेल्या आपल्याच सुखावर, वैभवावर खूष! साराच मामला सहजी जमून येतो; पण ह्या सुखावरही अचानक परिस्थितीची काजळी धरते. चमेलीच्या पोटावर अकालीच कसला तरी व्रण उठतो. बार्टलीसाहेब तिला एका चांगल्या मोठ्या डॉक्टरांना दाखवतो; पण डॉक्टरांचं निदान तर भलतंच भयंकर असतं! चमेलीमेमसाब कुष्ठरोगानं ग्रास-ल्याचं तो बार्टलीसाहेबाला सांगतो. बार्टली चांगलाच हादरतो. तिच्यासाठी त्याचा जीव तुटतो. तो तिला खास उपचारासाठी परदेशी नेण्याचीही तयारी दर्शवतो. तर डॉक्टर म्हणतात, उपाय काय सगळीकडं सारखेच! बार्टलीची चांगलीच कुतरओढ होते. सारी स्वप्नं क्षणार्धात निकाली निघतात. हळव्या भावनांची दशा उडते; पण त्याचं चमेली-वरचं प्रेम मात्र सच्चं, म्हणूनच अढळ असतं.

बार्टलीसाहेबाचा जीवनप्रवास पुन्हा एकाकी होऊन जातो. त्याला तो जसा जबा-बदार नसतो तशीच चमेलीदेखील. खडतर परिस्थितीच त्यांना खेळवायला निघालेली असते. बार्टलीसाहेब डॉक्टरांनी घालून दिलेली पथ्यं यथातथ्य पाळतो. चमेलीला ह्यानंतर तिनं जन्माला घातलेल्या स्वतःच्या मुलीपासून देखील चार हात दूरच राखतो. चमेलीचं मातृमन चांगलंच कळ-वळतं. मुलीसाठी तिचा जीव तुटतो; पण डॉक्टरांचा सल्ला साजेसाच असतो. औषध-उपचार चालूच असतात आणि तशात चमेलीची बोटंही झडू लागतात. बार्टलीसाहेब तिची सारी तैनात राखतो; पण एकीकडं असा भयंकर रोग आणि दुसरीकडं पोटच्या पोरीवरचं प्रेम. चमेलीचं मन सारखंच हिंद-कळत रहातं. शिवाय बार्टलीचा दुरावाही मन बोचकारत असतोच. हे सारं काही चमे-लीला असह्यप्राय होऊन बसतं. एका रात्री बार्टलीसाहेबाच्या बंगल्याच्या आवारात एका झाडाला टांगून घेऊन चमेली आत्मघात करून घेते.

ह्या घटनेनं बार्टलीसाहेब खचतो. खिन्न होऊन जातो. एकीकडे चमेलीवरचं प्रेम, दुसरीकडे स्वतःची मुलगी आणि तिसरीकड खवळून उठलेले मळे-कामगार बार्टलीसाहेबा-वर सरळ चालून येतात. वस्तुस्थितीची जाण नसलेला समाज बार्टलीबद्दल नाना अपसमज पसरवतो. 'बार्टलीला असली मेमसाब नकोच होती म्हणून त्यानंच चमेलीचा खून केला' ह्यासारख्या अनेक गावगप्पा! तो सारा गावच आता बार्टलीला पाण्यात पाहू लागतो, टाळू लागतो. तो दिसताच उघडी घर-दारं बंद करू लागतो.

चमेलीच्या मृत्यूचं रहस्य बार्टलीच्या मनातच पडून रहातं. आपल्या उपेक्षित अंत-रंगात मात्र तो तिच्यावरच प्रेम करतो. रोजच्या रोज चमेलीच्या थडग्यावर फुलं वाहतो बार्टलीचं प्रेमबंधन अतूट असतं.

पण अखेर ह्या उपेक्षित, उपहासित जिण्यालाही बार्टलीसाहेब कंटाळतो आणि तोही एक माणूसच असतो. अशा उद्ध्वस्त, विषण्ण मनःस्थितीत तो मायदेशी परत जायचं ठरवतो; पण इथंही दैव आडवं येतं. चमेलीच्या मुलीची जबाबदारी मागं असतेच. विकृत अवस्थेत जन्मलेली ती मुलगी आता केव्हाच नीट सुधारणार नसते. म्हणजे तिचा कसा तरी शेवट होईतो बार्टलीला तिथंच जगत रहाणं भाग होतं. मग आपल्या ऑल्सेशियन कुत्र्याच्या सान्निध्यात तो 'त्या' मुक्तीच्या क्षणाची वाट पहात रहातो. एकाकी विषण्ण बंगल्यात राहून पूर्वायुष्या-तल्या आठवणी, स्वप्नं उघड्या डोळ्यांनी पहात परिस्थितीकडे चालत रहातो.

धीरगंभीर, भावनाहीन, गोऱ्या साहेबाची, बार्टलीची ही शोकांतिका. ती फारशी प्रभावी नसली किंवा काहीशी कृत्रिमपणे घडत जात असली तरी मुळात मर्यादित अपेक्षा ठेवून जाणाऱ्या आपल्यासारख्याला ती मुळीच असमाधान देत नाही. रित्या मनानं जाऊन देखील आपण रित्या मनानंच परत फिरत नाही. आजवर चार हात दूर असलेला हा प्रदेश, आसाम, आपल्या आता काहीसा जवळ आल्यासारखा भासतो. 'चमेली-मेमसाब'सारख्या आसामी चित्रपटाची ही जमेची बाजू निश्चितच लक्षणीय ठरेल.

□

चित्रपट : **चमेली मेमसाब**
दिग्दर्शक : **अब्दुल मजीद**
भाषा : **आसामी**

कापूस एकाधिकार योजना : पृष्ठ ४ वरून

म्हणजे थोडीशी रक्कम त्याला द्यायची आणि पूर्ण रक्कम मिळाल्याच्या कागदावर त्याची सही घ्यायची याबाबतची काही आकडेवारी माजी आमदार श्री. नारायणराव काळे यांनी दिली. एकट्या आर्वी गावात सहा व्यापाऱ्यांनी या वर्षी योजना सुरू व्हायच्या आधी (योजना २६ डिसेंबर ७८ रोजी सुरू झाली) खरेदी केलेल्या कापसाचे ४२७८०२०–००. रुपये वीस जानेवारीपर्यंत दिलेले नव्हते ! त्याखेरीज कास्तकारांना फसवायचे आणखीही काही मार्ग होते. प्रथम जास्त रक्कम द्यायचं मान्य करायचं, कापूस उचलायचा आणि कास्तकार पैसे आणायला गेला की, तुझा कापूस आतमध्ये कमी दर्जाचा होता असे सांगून पैसे कापायचे. कित्येक व्यापारी धर्मादाय फंड म्हणून पाच टक्के रक्कम कापायचे. जर कास्तकार वजनदार असामी असली तर मात्र सर्व रक्कम तावडतोब. त्याखेरीज आडते ( दलाल ) आपला हिस्सा कापायचे. असाच एक आडत्या, अकोल्याचे रामराव ××× यांनी तर स्पष्टच सांगितलं, 'आपण या व्यवहारात हंगामात दहा ते बारा हजार कमवायचो ! '

या वर्षी या योजनेत कापसाचं ग्रेडिंग बरोबर होत असल्याचं सगळ्याच कास्तकारांनी मान्य केलं. शासनानं प्रमुख खरेदीदार म्हणून नेमलेल्या द महाराष्ट्र स्टेट-कॉऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लिमिटेडनं दोन प्रकारच्या ग्रेडर्सची या कामी नेमणूक केली आहे. यातले काही ग्रेडर्स–शेतकी पदवीधारक असून त्यांना ग्रेडिंगचं प्रशिक्षण देण्यात आलं आहे, तर काहीजण पूर्वी व्यापाऱ्यांकडे ग्रेडर्सचं काम करत होते त्यांना त्यांच्या अनुभवामुळं नेमण्यात आलं आहे. व्यापाऱ्यांकडे ग्रेडर म्हणून काम करणाऱ्या खामगाव इथल्या पुरोहित या ग्रेडरनं व्यापाऱ्याच्या सांगण्यावरून आपण कास्तकाराला फसवत होतो असं प्रांजळपणं कबूल केलं. त्याशिवाय कापसाची ग्रेड ठरवण्याचे जे नवे निकष आहेत ते कास्तकारांना फायद्याचे आहेत.

ग्रेडरनं दिलेली ग्रेड कास्तकाराला मान्य होईलच असं नाही. अशा वेळी निर्माण होणाऱ्या वादासाठी वांधासमित्या नेमण्यात आल्या आहेत. या समितीत, बाजारसमितीचे दोन सदस्य, त्यावेळी हजर असणारे दोन कास्तकार आणि ज्या ग्रेडरच्या निर्णयावरून वाद निर्माण झाला आहे तो सोडून दुसरा ग्रेडर अशा पाच जणांचा समावेश असतो आणि या समितीचा निर्णय अंतिम असतो.

या वर्षी फेडरेशननं कापूस खरेदी केंद्र अशा ठिकाणी उघडली आहेत की, कास्तकाराला दहा मैलांपेक्षा जास्त अंतर जायला लागू नये. त्यामुळं पहाटे निघालेला कास्तकर चेक घेऊन रात्रीपर्यंत घरी जाऊ शकतो. त्याखेरीज सगळ्या कास्तकारांना केंद्रावर माल कधी आणायचा याचे वार ठरवून दिले आहेत.

अकोल्याजवळच्या पारंजागावचे एक प्रगतिशील शेतकरी प्रल्हाद सावरकर यांनी या योजनेमुळं चोऱ्या थांबल्या, हा एक महत्त्वाचा फायदा सांगितला. पूर्वी कापसाची चोरी केल्यानंतर तो खुल्या बाजारात विकला जायचा. आता प्रत्येक कास्तकाराला कार्ड देण्यात आलं आहे. त्यामुळं कोणीही कापूस विकू शकत नाही. या वेळी बोलताना श्री. सावरकर यांनी कापसाच्या किंमती अजून पन्नास टक्के वाढवाव्यात असं सांगितलं. त्यांनी खताच्या, जंतुनाशकांच्या किंमती दुपटीनं किंवा त्याहून जास्त पटीत कशी वाढल्या आहेत याची आकडेवारीच सादर केली.

याआधीच्या योजनांमध्ये कास्तकारांना मिळणाऱ्या बोनसमधून २५% रक्कम चढउतार निधीसाठी (Fluctuation fund) कापण्यात येत असे हाच दर आता ५०% इतका आहे. त्याखेरीज हमीदरातून ५% रक्कम त्याच्याकडं कर्ज असेल तर त्याची वसुली म्हणून कापण्यात येत असे. तो दर आता ३०% कर्जवसूली हमी दरातून आणि १०% कर्जवसुली बोनसमधून असा आहे. हमी किंमत आणि कापसाची अंतिम किंमत यातल्या फरकाला बोनस म्हटलं जातं.

महाराष्ट्रातल्या एकूण तीनशेपंच्याहत्तर जीनिंग आणि प्रेसिंग फॅक्टरीजपैकी एकशेदहा सहकारी आहेत. या सहकारी फॅक्टरीज ही एकाधिकार योजना असते तेव्हाच फक्त फायद्यात चालतात, अशी माहिती फेडरेशनच्या एका अधिकाऱ्याने दिली. याचा अर्थ सरकारी मदतीशिवाय सहकार स्पर्धेत टिकू शकत नाही असा करायचा का ?

विदर्भातल्या सहकारी आणि खाजगी अशा दोन्ही प्रकारच्या फॅक्टरीज आम्ही पाहिल्या. यात कुठेही आग विझवण्याची पुरेशी यंत्रणा आढळली नाही. काही ठिकाणी पाण्याची थोडीशी पिंपं फक्त आढळली. कापसासारख्या पटकन् जळणाऱ्या गोष्टीबाबत एवढं दुर्लक्ष कसं केलं जातं ? आणखी एक खटकणारी बाब म्हणजे कुठल्याही फॅक्टरीत कामगारांना तोंडावर बांधण्यासाठी फडकी देण्यात आली नव्हती. याबद्दल आम्ही विचारलं तेव्हा कामगारांना हळूहळू सवय होते, असं उत्तर मालकांच्या बाजूनं देण्यात आलं, पण कामगारांशी बोलताना त्यांना अशा फडक्यांची आवश्यकता असल्याचं जाणवलं. विशेषत: प्रेसिंग विभागातल्या कामगारांना जास्तच गरज आहे. कापसाचे बारीक तंतू नाका-तोंडातून आत गेल्यानं क्षयरोग होण्याची शक्यता असते, असं मत अनेक डॉक्टरांनी दिलं आहे. साध्या प्रथमोपचार-पेटीची व्यवस्थाही अनेक फॅक्टरीत नव्हती.

### योजनेचे भवितव्य

या योजनेला या आधीच्या वर्षात अयशस्वी करण्यासाठी काही धेंडांनी प्रयत्न केल्याचं आम्ही ऐकलं होतं. ते खोटं असल्याचं फेडरेशनचे जॉइन्ट डायरेक्टर श्री. फाटक यांनी सांगितलं. त्याचबरोबर असे प्रयत्न यापुढं होणार नाहीत असं नाही, हेही त्यांनी स्पष्ट केलं. या योजनेला राज्यसभा सदस्य श्री. मोतिराम लहाने यांचा जोरदार विरोध होता; परंतु त्याचं कारणही या दौऱ्यात कळलं. कापसाला वाढीव भाव, ग्रेडिंगमधला फरक, तसंच कास्तकाराला ताबडतोब पैसे इत्यादी प्रमुख बाबींवर त्यांचे मतभेद होते; पण या वर्षी या सगळ्या मागण्या मान्य झाल्यानं त्यांचा विरोध नसेल.

फेडरेशनचे अमरावती जिल्हा संचालक आणि कॉंग्रेस आयचे श्री. सुधाकर भुयार म्हणाले की, ही योजना कुठल्याही कारणामुळं स्थगित झाली तर कास्तकार आंदोलन करतील आणि त्या आंदोलनाला सर्व राजकीय पक्षांचा पाठिंबा राहील. योजनेचं भवितव्य ठरवताना ते उद्‌गार महत्त्वाचे ठरावेत.

–सुहास फडके

मुंबई वार्ता : पृष्ठ ५ वरून

उस दु:ख में नहीं जिसे, बेझिझक मैंने पिया है. □

# □ हिंदुस्तानी आंदोलन

बँक-कर्मचाऱ्यांचे आंदोलन चालू असतानाची गोष्ट! एके दिवशी भर दुपारी हिंदुस्तानी आंदोलनाचे प्रवर्तक श्री. मधू मेहता आपल्या दोन सहकाऱ्यांसह मुंबईतल्या हुतात्मा चौकात धरणे धरून बसले होते. त्यांच्या आजूबाजूस तीन फलकांवर सुमारे तीन हजार पत्रे 'बँक-कर्मचाऱ्यां'साठी वाचावयास ठेवली होती आणि शांतपणे श्री. मेहता आपल्यासभोवती गोळा झालेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या संपाबाबत जनतेच्या भावना व्यक्त करणारी ती पत्रे वाचण्याची विनंती करीत होते; पण शांतपणे चर्चा झाली तर हा धरण्याचा प्रकार उधळून कसा लावणार? संतप्त बँक-कर्मचाऱ्यांनी श्री. मेहता यांना उद्देशून लाखोली वगैरे तर वाहिलीच; पण निंदाव्यंजक भाषणेही केली. सगळ्यात विनोदी प्रकार म्हणजे मेहता यांना 'बांगड्या' देण्याचा. वस्तुत: श्री. मेहता आपल्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून आलेली जनतेची पत्रे बँक-कर्मचाऱ्यांसमोर ठेवून असंख्य ठेवीदारांची बाजू धीटपणे मांडत होते, मग त्यांना बांगड्या देण्याचे प्रयोजन काय?

पूर्वी स्वतंत्र पक्षाचे सरचिटणीस असलेले श्री. मधू मेहता १९७३ पासून राजकारणातून निवृत्त झाले व तेव्हापासून 'हिंदुस्तानी आंदोलन' ही चळवळ त्यांनी संघटित केली आहे. राजकारणात नसलेल्या परंतु विचारशील अशा लोकांना त्यांच्या कल्पना व त्यांचे विचार व्यक्त करण्यासाठी व मुख्य म्हणजे सामायिक विचारातून ठरलेली प्रत्यक्ष कृती करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध असावे हा या चळवळीमागचा मुख्य उद्देश आहे. 'मानवी मूल्यांचा ऱ्हास थांबविणे व नव्या परिस्थितीशी, आधुनिक जगाशी जुळवून घेईल असा आणि आपल्या शाश्वत जीवनमूल्यांना विसरणार नाही असा नवा मानव घडविणे' हेही या चळवळीचे ध्येय असल्याचे सांगण्यात येते.

कोणत्याही चळवळीची ध्येये सामान्यत: अशीच खूपच आकर्षक, प्रेरक वगैरे असतात; पण या उद्दिष्टांच्या अनुषंगाने हिंदुस्तानी चळवळीने जे छोटे-मोठे कार्यक्रम हाती घेतले होते व आतापर्यंत जे उपक्रम केले आहेत ते विशेष नोंदणीय आहेत.

प्रारंभी या चळवळीमार्फत एक सर्वेक्षणाचा उपक्रम पार पडला. भारतीय समाजव्यवस्थेत कुटुंब हा एक प्रधान घटक आहे. इतकेच नव्हे तर कुटुंबव्यवस्था हे भारतीय जीवनपद्धतीचे असामान्य वैशिष्ट्य आहे. एकत्र कुटुंबपद्धती आता जवळजवळ लयास गेली आहे; पण नव्या विभक्त कुटुंबपद्धतीतही 'कुटुंबपण' नष्ट होत चालले आहे. मुंबईत आणि विशेषत: श्री. मेहता जिथे रहातात त्या मलबार हिल परिसरात ही भग्न कुटुंबव्यवस्था अधिकच जाणवते. आई, वडील आणि मुले यांच्यात या कुटुंबामध्ये दिवसाकाठी आपुलकीच्या चार गोष्टीसुद्धा होत नसतील. मध्यम वर्गीय कुटुंबात हा कौटुंबिक जिव्हाळा साधारणत: असतो; पण तरीही पूर्वीपेक्षा त्याचे प्रमाण कमीच. ही सगळी परिस्थिती लक्षात घेऊन हिंदुस्तानी चळवळीने सुमारे २००० परिवारांचे निरीक्षण करून आपले निष्कर्ष अनेक सामाजिक संस्थांना सादर केले.

हिंदुस्तानी चळवळीचे बहुसंख्य सदस्य उच्चभ्रू, श्रीमंत वर्गातले आहेत. या वर्गात वारंवार भोजनसमारंभ आणि पार्ट्यांवर वारेमाप पैसा उधळला जातो हे नव्याने सांगण्याची गरज नाही. ह्याच श्रीमंतांना सामाजिक जाणीव देण्याचा या चळवळीचा प्रयत्न आहे. मुंबईतील २०० गरीब परिवारांना या चळवळीने याच प्रयत्नातून मदत दिली आहे. कामाठी किंवा घरगड्यांची कामे करणाऱ्यांच्या कुटुंबातील एखाद्याचे शिक्षण किंवा एकूण उदरनिर्वाहाची जबाबदारी या संघटनेच्या सदस्यांनी घेतली आहे.

या चळवळीच्या सूत्रधारांच्या सांगण्यानुसार या संघटनेचे देशभरात लाख-दोन लाख सदस्य आहेत व मुख्यत्वे मुंबईत क्रियाशील कार्यकर्ते आहेत. अर्थतज्ज्ञ, कलाकार, संख्याशास्त्रज्ञ, वैज्ञानिक, साहित्यिक, डॉक्टर्स इ. बुद्धिजीवींचा भरणा या चळवळीत प्रामुख्याने दिसून येतो. या बुद्धिजीवींना मौखिक चर्चेतून प्रत्यक्ष कृतीपर्यंत आणावे यासाठी ही चळवळ प्रयत्नशील आहे. त्यासाठी विविध विषयांतील तज्ज्ञ व्यक्तींचे अभ्यासगट नेमण्यात आले आहेत. आपल्या मासिक बैठकीतून वर्तमान परिस्थितीशी संबंधित अशा समस्यांवर काही तोडगे शोधण्याचा प्रयत्न केला जातो. पुरनियंत्रण, सुवर्णलिलाव, चलनवाढ, नवा अभ्यासक्रम इ. विविध विषयांच्या संदर्भातील समस्यांचा या अभ्यासगटातून विचार होत असतो. पूरनियंत्रणाबाबत अनेक मौलिक सूचना या अभ्यासगटांनी केल्या होत्या; पण फार कमी राज्य सरकारांनी त्याची दखल घेतली असे चळवळीच्या सूत्रधारांकडून समजले.

शिवाय या चळवळीमार्फत विविध प्रश्नांबाबत लोकांची उदासीनता कमी व्हावी म्हणून मतचाचणी घेण्यात येते व ह्या उपक्रमाला भरघोस प्रतिसाद मिळतो. बिहार, उत्तर प्रदेश व गुजरात राज्यात काही खेड्यांतूनही चळवळीचे काम सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे.

श्री. मेहता यांचा पूर्वीचा स्वतंत्र पक्ष, श्रीमंत लोकांमधे असलेले या चळवळीचे कार्य आणि मलबार हिल हे मेहता यांचे कार्यक्षेत्र हे सारे पहाता या चळवळीला मर्यादा आहेत हे स्पष्ट आहे. चळवळीच्या सूत्रधारांनी दिलेल्या माहितीनुसार चळवळीला मिळणारा प्रतिसाद खरोखरच चांगला असेल तर ती आशादायी गोष्ट ठरेल; पण हे कार्य, विशेषत: काही निवडक उपक्रम, मध्यम वर्गीयांपर्यंत जाऊन पोहोचण्याची गरज आहे. अन्यथा, फॅशन म्हणून समाजकार्य करणारांची आणखी एक संघटना यापलीकडे या चळवळीला अर्थ उरणार नाही. □